म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २२८९

# विशाखा

— कवि- कुसुमाग्रज.

REFBK-0010587

# विशाखा

कवि

कुसुमाग्रज

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व.
अनुक्रम २८५१८ वि: काव्य
क्रमांक १४४१ नों: दि: १५।०।८२
१४४१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०५(२८)
शाखा
REFBK-0010587
REFBK-0010587

स्कूल ॲण्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

किंमत रु. २=५०

प्रकाशक :

**दामोदर नारायण मोघे, बी.ए.**

स्कूल ॲण्ड कॉलेज बुकस्टॉल,

**कोल्हापूर.**

मुखपृष्ठ चित्रकार : श्री. दीनानाथ दलाल

आवृत्ति पांचवी : जुलै १९५९

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :

सदाशिव रामचंद्र सरदेसाई,

बी.ए., एल्‌एल्.बी.,

नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'

छापखाना, ४१ बुधवार, पुणें २

दादा आणि माई

यांच्या स्मृतीस

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| दूर मनोऱ्यांत | १ |
| हिमलाट | २ |
| स्वप्नाची समाप्ति | ३ |
| ग्रीष्माची चाहूल | ६ |
| अहि-नकुल | ८ |
| किनाऱ्यावर | ११ |
| अवशेष | १३ |
| मातीची दर्पोक्ति | १५ |
| गोदाकांठचा संधिकाल | १८ |
| स्मृति | २० |
| हा कांठोकांठ कटाह भरा | २१ |
| आगगाडी व जमीन | २३ |
| क्रांतीचा जयजयकार | २६ |
| जालियनवाला बाग | २९ |
| जा जरा पूर्वेकडे | ३० |
| तरीही केधवा | ३२ |
| मूर्ति-भंजक | ३४ |
| कोलंबसाचें गर्वगीत | ३८ |
| आस | ४० |
| बळी | ४१ |
| लिलांव | ४३ |
| पृथ्वीचें प्रेमगीत | ४४ |
| गुलाम | ४६ |
| सहानुभूति | ४८ |
| सात | ४९ |
| माळाचें मनोगत | ५१ |
| ऋण | ५३ |
| उमर खैयाम | ५४ |
| विजयोन्माद | ५५ |
| शेवटचें पान | ५६ |
| उषःकाल | ५८ |
| तूं उंच गर्डी राहसि | ६० |
| प्रीतीविण | ६१ |
| नदीकिनारीं | ६२ |
| पाचोळा | ६३ |
| बंदी | ६४ |
| आव्हान | ६५ |
| बायरन | ६६ |
| प्रतीक्षा | ६७ |
| आश्वासन | ६९ |
| प्रकाश प्रभु | ७० |
| मेघास | ७१ |
| भाव-कणिका | ७२ |
| ध्यास | ७४ |
| निर्माल्य | ७५ |
| जीवन-लहरी | ७६ |
| पावनखिंडींत | ७८ |
| सैगल | ७९ |
| कुतूहल | ८० |
| असलि कुठें तूं | ८१ |
| भक्तिभाव | ८३ |
| नेता | ८[illegible] |
| बालकवि | ८[illegible] |
| वनराणी | ८[illegible] |
| देवाच्या दारीं | ८[illegible] |
| टिळकांच्या पुतळ्याजवळ | ९[illegible] |
| समिधाच सख्या या | ९[illegible] |

# विशाखा

[illegible] स्वकृत.
अनुक्रमांक ......[illegible]...... वि: ......[illegible]......
क्रमांक ......1213...... नों: दि: ......[illegible]......

अनुक्रमांक ......
ग्रंथांक ......

# अर्घ्यदान

## [ पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना ]

रत्नहाराचें तेजस्वी सौंदर्य कुणाला समजावून सांगावें लागत नाहीं. डोळयांना तें आपोआपच जाणवतें. रातराणीच्या सुगंधाची कुणी चर्चा करीत बसत नाहीं. वाऱ्याच्या झुळुकेबरोबर तो आला कीं मन क्षणार्धात प्रसन्न होऊन जातें. लहान मुलाच्या नाजूक पाप्याची अवीट गोडी कळायला पुस्तकी पांडित्याची आवश्यकता नाहीं. एकाच स्पर्शात ओठांना त्या अमृताची माधुरी कळते. सुंदर आणि सजीव कवितेचेंही असेंच आहे. तिला प्रस्तावना हवी कशाला ? असें असूनही कुसुमाग्रजांची कविता आणि रसिक यांच्यामध्यें येऊन मी थोडी लुडबुड करीत आहें, याला अनेक कारणें आहेत. मराठी वाचकांच्या अभिजात काव्यप्रेमाला ओहोटी लागल्यानंतरच्या काळांत–गेल्या दशकांत–कुसुमाग्रजांचा उदय झाला. त्यामुळें नामांकित मासिकांतून त्यांची कविता प्रसिद्ध झाली असूनही तिचा व्हावा तितका प्रसार अथवा बोलबाला होऊं शकला नाहीं. कुसुमाग्रज गायक कवि असते तर कविता लोकप्रिय करण्याचा एक मार्ग तरी त्यांना मोकळा राहिला असता ! पण त्याचाही त्यांनीं कधीं अवलंब केल्याचें दिसत नाहीं. याचें कारण त्यांचा संकोची स्वभाव असेल किंवा गोड गळयाचा अभाव असेल ! गातां येत नसलें तरी अन्य प्रकारच्या अनुकूलतेमुळें आपल्या कवितेच्या चुटक्यांचें कित्येकांनीं जें कौतुक घेतलें, तें पदरांत पाडून घेण्याइतकें व्यवहारकौशल्यही त्यांच्या अंगीं ... जाहिरात ही कलियुगांतील पासष्टावी कला आहे असें म्हणतात. ...जकाल सिनेमापासून साहित्यापर्यंत सर्वत्र दृष्टि फेकली तर या ...ष्टांत जाहिरातीचाच नंबर हटकून पहिला लागेल ! बिचाऱ्या ...सुमची या कलेंतहि गति नसल्यामुळें अधूनमधून प्रसिद्ध होणाऱ्या शील...स्वी काव्याचें व्हावें तितकें स्वागत कधींच झालें नाहीं ! ... दशकांत काव्यप्रदेशावर बोलपटसृष्टीचें आक्रमण वाढत्या ... झालें आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेच्या रसग्रहणाला तेंहि ...लें, असेंच म्हणावें लागेल. बोलपटांतलीं गाणीं नुसतीं

ढंगदार असलीं तरी तीं चटकन् लोकप्रिय होतात. त्या गाण्यांत कल्पनेची उत्तुंग विशालता अथवा भावनेची उत्कट आर्तता बहुधा नसते. किंबहुना हे गुण तिथें अवगुणच ठरण्याचा संभव असतो. शब्दांचा नट्टापट्टा आणि स्वरांचा नखरा एवढ्या भांडवलावर चित्रपटांतलीं गाणीं लोकांच्या जिभेवर खेळूं लागतात ! वृक्षरानींतून चमकणाऱ्या काजव्यांकडे लोक पुनः पुन्हां कौतुकानें पाहतात; पण क्षणार्धांत आकाश उजळून जाणाऱ्या विजेचें दर्शन होतांच ते डोळे मिटून घेतात ! तसाच कांहींसा प्रकार चित्रपटांतलीं पदें आणि अभिजात काव्यें यांच्या बाबतींतहि सध्यां होऊं पाहत आहे.

प्रीतीप्रमाणें कीर्तीचाही मार्ग सरळ नसतो हें कटु सत्य कुसुमाग्रजांच्या अनुभवाला थोडेंफार आलें असलें तरी आजच्या साहित्यक्षितिजावरील एक तेजस्वी तारा या दृष्टीनें त्यांच्याकडे अनेक रसिक पाहत आले आहेत यांत मात्र शंका नाहीं. प्रतिभासंपन्न कवीपासून कर्तबगार देशसेवकापर्यंत विविध मनोवृत्तींच्या लोकांना त्यांच्या कवितेनें मोहिनी घातली आहे. वाचनालयाच्या भिंतीपासून तुरुंगाच्या भिंतीपर्यंत किती तरी ठिकाणीं त्यांच्या तेजस्वी वाणीचे पडसाद उमटले आहेत. आणि असें व्हावें यांत नवल तें काय ? केशवसुत, टिळक, बालकवि वगैरे कवि महाराष्ट्राचे कालचे कवि होते. तांबे–यशवंत–काणेकर इत्यादि कवि महाराष्ट्राचे आजचे कवि आहेत. पण महाराष्ट्राच्या किंबहुना हिंदभूमीच्या उद्यांच्या आशा–आकांक्षांचे उद्गाते म्हणून ज्यांच्याकडे अभिमानानें बोट दाखवितां येईल अशा तरुण मराठी कवींची आपण गणना करूं लागलों तर कुसुमाग्रजांच्या नांवानें अनामिकाच धरावी लागेल. टिळक जसे फुलांमुलांचे कवि होते किंवा गोविंदाग्रज जसे कल्पनारम्य प्रणयाचे कवि होते, तसे कुसुमाग्रज हे मानवतेचे कवि आहेत. आजच्या सामाजिक असंतोषाचा ज्वालामुखी त्यांच्या कवि[illegible] इतर काव्यांप्रमाणें नुसता धुमसत नाहीं, तो अग्निरसाचा वर्षाव करीत [illegible] या काव्यसंग्रहाच्या उपसंहारांत ते वाचकाला आपल्या कवितेविषयीं सां[illegible]

> ‘ समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा
> कोठून फुलांपरि वा मकरंद मिळावा ?
> जात्याच रुक्ष या एकच त्या आकांक्षा
> तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा. ’

८ १ भारत १ २

कुसुमाग्रज आपल्या कवितांना रुक्ष समिधा म्हणून संबोधतात. पण मला वाटतें, त्यांच्या प्रतिभेला उपमा द्यायचीच असली तर ती 'शमी-वृक्षाची देतां येईल. 'त्या वृक्षाप्रमाणें तिच्या अंतरंगांत दाहक अग्नि तर आहेच, पण अज्ञातवासांतून मुक्त होतांना शमीवृक्षानें पांडवांना त्यांचीं शस्त्रें जशीं अधिक तेजस्वी करून दिलीं त्याप्रमाणें विषमता, पिळणूक, गांजणूक आणि अन्याय यांच्याविषयींची बहुजनसमाजाची चीड कुसुमाग्रजांनीं अत्यंत उत्कट आणि सुंदर स्वरूपांत आपल्या काव्यांतून व्यक्त केली आहे.' बळी (पृ. ४१), लिलांव (पृ. ४३), सहानुभूति (पृ. ४८), माळाचें मनोगत (पृ. ५१), पाचोळा (पृ. ६३) इत्यादि कविता या दृष्टीनें अतिशय सरस आहेत. गरिबांनीं मरमर मरावें नि श्रीमंतांनीं त्यांच्या जिवावर चरावें हा आजचा विषम समाजांतला सर्वांत मोठा अन्याय आहे. या अन्यायाला बळी पडलेल्या एका साध्याभोळ्या निष्पाप जीवाचें कवीनें 'बळी' या कवितेंत केलेलें वर्णन आंतडें पिळवटून टाकील असेंच आहे. 'लिलांव' या कवितेंत भांडवलशाही समाजरचनेंत सावकाराच्या टांचेखालीं चिरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्याचें कवीनें केलेलें चित्रण कुणाला हृदयस्पर्शी वाटणार नाहीं? कष्ट करून अर्धपोटीं राहणाऱ्या त्या बापड्याच्या झोंपडींतून, धान्य, बाजलें, थाळी, गाडगींमडकीं वगैरे सर्व वस्तु लिलांवाकरितां बाहेर काढल्या जातात! त्याचें उपाशीं पोर भुकेनें व्याकूळ होऊन रडूं लागतें! गरीब बिचारी शेतकरीण त्याला शांत करण्याकरितां पाजूं लागते! लगेच सावकाराचें लक्ष तिच्याकडे जातें; आणि—

'ऊर उघडें तें तिचें न्याहळोनी
थोर थैलींतिल वाजवीत नाणीं
'आणि ही रे!' पुसतसे सावकार
उडे हास्याचा चहुंकडे विखार!'

ज्या समाजरचनेंत गरिबाच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा असा लिलांव मांडला जातो, ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नष्ट झाली पाहिजे असा त्वेष वाचणाऱ्याच्या मनांत उत्पन्न करण्याची शक्ति या कवितेंत निःसंशय आहे. 'सहानुभूति' या कवितेंत गरिबालाच गरिबाविषयीं कळकळ वाटते असें कवीनें सूचित केलें आहे. 'माळाचें मनोगत' व 'पाचोळा'

या कवितांतही दलितांच्या गांजणुकीचें चित्र कवीनें किती सहृदयतेनें काढलें आहे ! माळाचें सारें जीवन उजाड एकलकोंडें—सुखशून्य ! स्वर्गांत कुठें-तरी नंदनवन आहे असें त्यानें ऐकलेलें असतें. वनें आणि उपवनें यांचीं सौंदर्यवर्णनेंही त्याच्या कानांवर पडलेलीं असतात. पण या ऐकीव गोड गोष्टींपैकीं एकही त्याच्या वांटयाला येत नाहीं. साधी वेलसुद्धां त्याला सोबत करीत नाहीं. मग फुलांची गोष्ट कशाला हवी ? तो एकसारखा मनांत झुरत राहतो—

‘ वाटतें बुलबुल कोयळ यावे
मंजूळ संगीत तयांनीं गावें
जीवन जाणीव सारी
विरावी घटकाभरी
येऊन कधीं तें घुबड मात्र
भीषण भासवी अधिक रात्र ’

आणि असल्या भकास जीवनाला कंटाळून गेलेला माळ शेवटीं उद्‌गारतो—

‘ कशास आयुष्य देवा, इतुकें
शतकामागून जातीं शतकें ! ’

हें दीन, दरिद्री आणि दुःखमय जीवन दलितवर्ग पिढयान्‌पिढया कंठीत आहे ! पण झोंपडींत राहणारांची पर्वा महालांतल्या मिरासदारांनीं कधीं केली नाहीं आणि बंगल्यांतले बडे लोक कधीं करणार नाहींत ! एक साधीच गोष्ट घ्या. बुद्ध, एकनाथ आणि गांधीजी यांच्यासारख्या महात्म्यांनीं, उक्तींनीं आणि कृतींनीं समाजाला माणुसकी शिकविण्याचा निकराचा प्रयत्न केला असेल ! पण अद्यापिही अस्पृश्यतेचें पिशाच्च हिंदुस्थानांत नंगा नाच घालीत आहे ! बारा बारा तास नळाचें पाणी मिळत असल्यामुळें खेडेगांवांतून किंबहुना कित्येक मोठ्या गांवांतूनही कळशीभर पाण्याकरितां हरिजनांना जे हाल भोगावे लागतात त्याची आम्हांला कल्पनाही करतां येत नाहीं. भागवतधर्माच्या, भूतदयेच्या नि सामाजिक सुधारणेच्या मलमपट्या लावून विषमतेचा हा रोग नाहींसा करण्याचा संतांनीं आणि सुधारकांनीं पिढयान्‌-पिढया प्रामाणिक प्रयत्न केला. पण शस्त्रक्रियेचें काम मलमपट्ट्या करूं शकत नाहींत एवढेंच त्यांतून पुनः पुनः सिद्ध झालें. आमच्यांतले उदारमतवादी

श्रीमंत आपल्या मंद मुलांनासुद्धां शिक्षणाकरतां परदेशीं पाठविण्याच्या कल्पनांत गुंग होऊन राहतील! पण हरिजनांच्या साक्षरतेकरतां स्वतःच्या तिजोरीचें कुलूप मात्र ते कधींही उघडणार नाहींत! आमच्यांतले सुधारक-वृत्तीचे सुखवस्तु लोक वर्षातून एक वेळ सहभोजन करून कृतकृत्य होतील. पण दलितवर्गाचे अनेक प्रश्न त्यांना तीनशेंपासष्ट दिवस दोन्ही वेळां भरपूर जेवायला मिळाल्याखेरीज सुटणार नाहींत, या गोष्टीची मात्र ते दखल घेणार नाहींत! आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे दलितांच्या पोटीं जन्माला आलेल्या गुणी माणसालाही दलितच व्हावें लागतें.' 'आर्थिक, बौद्धिक आणि सामाजिक गुलामगिरींतून मुक्त होण्याचा एकसुद्धां मार्ग या उपेक्षितांना आम्हीं मोकळा ठेवलेला नसतो. 'पाचोळया'च्या रूपानें कुसुमाग्रजांनीं दलितवर्गाच्या या कारुण्यपूर्ण जीवनाचें किती भेदक चित्रण केलें आहे! झाडाच्या पायथ्याशीं पडलेल्या पाचोळयाला उषा हंसवूं शकत नाहीं अथवा रात्र रिझवूं शकत नाहीं. झाडावरलीं हिरवींगार पानें आणि झाडाखालचें हिरवेंगार गवत हीं सदैव हंसून त्याचा उपहास करीत असतात. वाटसरू त्याला तुडवून जातो. पण बिचारा पाचोळा शांतच असतो. शेवटीं—

'आणि अंतीं दिनिं एक त्या वनांत  
येइ धांवत चौफेर क्षुब्ध वात  
दिसे पाचोळा, घेउनी तयातें  
नेइ उडवुनि त्या दूर दूर कोठें!'

आणि पुढें?—  
पुढें काय?

'आणि जागा हो मोकळी तळाशीं  
पुन्हां पडण्या वरतून पर्णराशी!'।

हीं सारीं सामाजिक दुःखें नाहींशीं कशीं व्हायचीं? जुना धर्म, जुनी नीति, जुनी समाजरचना म्हणते 'देवाला शरण चला. तो दयाघन आहे. सर्व दुःखांचा परिहार करण्याला तोच समर्थ आहे!' पण हा उपदेश भोंदूपणाचा नसला तरी मूर्खपणाचा आहे हें कुसुमाग्रजांना कळून चुकलें आहे. मानवजातीनें ज्या दिवशीं दगडांतून देव निर्माण

करून त्याच्यापुढें आपलें डोकें वांकविलें, त्याच दिवशीं तिनें आपल्या प्रगतीच्या मार्गांत एक अनुल्लंघनीय धोंड निर्माण करून घेतली. हा काल्पनिक देव दुर्बळांचा मित्र होऊं शकत नाहीं. तो सत्ताधाऱ्यांना आणि संपत्तिवाल्यांना मात्र साहाय्य करूं शकतो. म्हणूनच 'देवाच्या दारीं' या कवितेंत कुसुमाग्रज देवाची जी संभावना करतात ती अगदीं यथार्थ वाटते.

'म्हणतात तुझ्या दयेला न अन्त
पुकारती सन्त थोरी तुझी
चिमण्यांच्या घरा लावसी मशाल
केवढी विशाल दया तुझी!
जळांतले जीव तापतां दुपारीं
वाळवटावरी ओढसी तूं!
तुझ्या महिम्याचीं प्रचंड पुराणें
गमती तराणे अर्थहीन!'

अनुभवांतीं देव दगड ठरतो! पण मनुष्य कांहीं केल्या दगड होऊं शकत नाहीं. आपला उद्धार आपणच केला पाहिजे याची जाणीव त्याला हळुहळू होऊं लागते. सारें सामाजिक तत्त्वज्ञान या जाणिवेंतूनच निर्माण होतें. पण स्वार्थ संभाळून आणि स्वत:चें उच्च आसन उच्च राहील, किंबहुना उच्चतम कसें होईल याचीच काळजी बाळगून जी सुधारणा केली जाते, ती समाजाच्या तळापर्यंत पोंचूं शकत नाहीं. वणवा विझवायला रंग-पंचमीच्या पिचकाऱ्या आणि म्युनिसिपालिटीचे बंब कसे उपयोगीं पडणार? हळव्या पण आत्मनिष्ठ सुधारकांचा हा दुबळेपणा मानवतेला प्रचित झाला कीं क्रांतीची कल्पना जन्माला येते. क्षणाक्षणानें आणि कणाकणानें सुधारणा होऊन मानवजात सुखी होईल हा भोळा आशावाद मागें पडतो आणि क्रांतीचें निशाण हातांत घेतलेल्या समतादेवीकडे समाजाचे डोळे लागतात. 'हा कांठोकांठ कटाह भरा' (पृ. २१), 'आगगाडी व जमीन' (पृ. २३), 'जा जरा पूर्वेकडे' (पृ. ३०), 'गुलाम' (पृ. ४६), 'बंदी' (पृ. ६४) इत्यादि अनेक तेजस्वी कवनांतून कुसुमाग्रजांनीं क्रांतीच्या दर्शनाचा मानवजातीला लागलेला ध्यास मोठ्या तन्मयतेनें वर्णन केला

आहे. त्यांची कल्पकता प्रत्येक वेळीं नव्या नव्या सुंदर रूपकांचा आश्रय करून या ध्यासाचें चित्रण करते. ‘ हा कांठोकांठ कटाह भरा ’ या कवितेंत नव्या जगाच्या उदयाची सूर्योदयाशीं केलेली तुलना मोठी मनोरम आहे. जुनें स्वप्नाळू जीवन टाकून देऊन नव्या वास्तव जीवनक्रमाला आपण सिद्ध झालें पाहिजे असा संदेश देतांना कवि म्हणतात—

‘ नभिं लागे तारांचें मोहळ,
भुलवी त्याची क्षणिक प्रभावळ,
रात्रीचे हे आश्रित केवळ,
ही मशाल त्यावर धरा जरा.
हा कांठोकांठ कटाह भरा !
या त्रिभुवन उजळित प्रभाकरा ’

‘ आगगाडी व जमीन ’ या कवितेंत कवीची कल्पकता व त्याची प्रेरकता यांच्यामध्यें जणूं कांहीं शर्यतच लागली आहे ! दलितवर्गावर होणाऱ्या जुलमाचें आणि त्याच्या प्रतिक्रियेचें या कवितेंतलें चित्रण अत्यंत प्रभावी आहे. अशा प्रकारच्या सर्व कवितांतून कुसुमाग्रज एकच तुतारी फुंकीत आहेत—जुनें जग मृत्यूच्या दारांत हतबल होऊन पडलें आहे. हुकुमशाही, साम्राज्यशाही, भांडवलशाही, भिक्षुकशाही इत्यादिकांनीं त्याचें पुरें पुरें रक्तशोषण केलें आहे. आजकालचीं भीषण महायुद्धें हे त्या जुन्या जगाचे शेवटचे आंचके आहेत. या जुन्या जगाला अजूनही एखाद्या संजीवनीनें जगवितां येईल ही कल्पना अगदीं खोटी आहे. त्या जगाची जागा आतां नव्या जगानेंच घेतली पाहिजे. पण नवें जग सुखा-सुखी निर्माण होत नाहीं. प्रीतीप्रमाणें क्रांतीचीही एकच कसोटी आहे—ती म्हणजे त्याग. म्हणूनच भविष्यकाळांतल्या समतेचीं गोड स्वप्नें पाहणारे, मानवजात इथून तिथून एक आहे अशी श्रद्धा बाळगणारे आणि स्वतःच्या रक्ताच्या अर्घ्यावांचून नव्या जगांतला पहिला सूर्य उगवणार नाहीं ही खात्री झालेले लेनिन आणि जवाहिरलाल यांच्यासारखे निरनिराळ्या देशांतले अत्यंत श्रेष्ठ असे ध्येयवादी एकच जयघोष करीत या नव्या सूर्याचें स्वागतगीत गात असतात—

‘ मृत्युंजय आम्ही ! आम्हांला कसलें कारागार !
अहो हें कसलें कारागार !
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हातीं
होउनिया बेहोष धांवलों ध्येयपथावरतीं
कधिं न थांबलों विश्रांतीस्तव, पाहिलें न मागें
बांधुं न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे.
एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार
होता पायतळीं अंगार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

या ओळी वाचल्या कीं नाशिकच्या गोदेच्या पाण्यांत कांहीं तरी विशेष सामर्थ्य आहे असें वाटूं लागतें. सावरकर आणि गोविंद यांच्या-प्रमाणें नियतीनें कुसुमाग्रजांचा नाशिकशीं निकटचा संबंध आणला तो कांहीं उगीच नाहीं.

आजच्या सामाजिक जीवनांतल्या अश्रु, असंतोष, चीड, द्वेष इत्यादि सार्‍या गोष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेंत आढळतात. पण या सर्वांचें नुसतें चित्रण करून ते थांबत नाहींत. त्यांचे अश्रु दुबळे नाहींत. त्यांतून दुर्दम्य आशावादाच्या ठिणग्या उडत आहेत. ‘ दूर मनोर्‍यांत ( पृ. १ ), ‘ कोलंबसाचें गर्वगीत ’ ( पृ. ३८ ) आणि ‘ सात ’ (पृ. ४९) या बाह्यतः अत्यंत भिन्न अशा तीन कविता पाहाव्यात. म्हणजे परिस्थितीची भीषणता पूर्णपणें जाणवत असूनही कुसुमाग्रज गोंधळून किंवा भांबावून गेलेले नाहींत याची खात्री होईल.

‘ मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनी खंड खंड सारा ’

या कोलंबसाच्या गीतांतल्या त्यांच्या ओळी नवें जग निर्मू पाहाणाऱ्या आजच्या मानवालाही मार्गदर्शक आहेत ! नाहीं कां ?

आजच्या समाजरचनेच्या कुजलेल्या अंतरंगाचें भेदक चित्रण करणारा हा कवि प्रचारक असलाच पाहिजे अशी अनेकांची स्वाभाविक समजूत होईल. पण कुसुमाग्रजांची प्रतिभा स्वभावतः प्रचारक नाहीं. ती कल्पक आहे; निर्माणक ( Creative ) आहे. खरा कलावंत प्रचार करीत नाहीं; तो त्याच्या कलाकृतींतून आपोआप होत असतो, या सिद्धांताचीं इर्वीं तेवढीं उदाहरणें या संग्रहांत मिळतील. कुसुमाग्रजांइतकी अष्टपैलू कल्पकता मराठी-तल्या फारच थोड्या लेखकांच्या वांट्याला आली असेल. 'मातीची दर्पोक्ति' (पृ. १९), 'आगगाडी व जमीन' (पृ. २३), 'माळाचें मनोगत'(पृ. ५१) इत्यादि कवितांतला कल्पकतेचा विलास पाहिला कीं शिवरामपंत परां-जप्यांच्या चमत्कृति आणि उपरोध यांनीं नटलेल्या प्रतिभेची आठवण होते. 'मूर्तिभंजक' (पृ. ३४) ही कविता वाचतांना रवींद्रनाथ किंवा खलिल गिब्रान यांची उत्तुंग कल्पकताच आपणांपुढें उभी आहे असा भास होतो. 'पृथ्वीचें प्रेमगीत' वाचून विशाल कल्पनेच्या पंखांवर बसून अनंताची आरती गाणाऱ्या सावरकरांचें आणि रुद्राला आवाहन करणाऱ्या तांब्यांचें स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. कवितेच्या आरम्भापासून तो तिला वस्त्राभूषणांनीं नटविण्यापर्यंत किंबहुना तिचें कुंकूं अगदीं रेखीव करण्या-पर्यंत कुसुमाग्रजांची कल्पकता सिद्धहस्त आहे. सैगलला उद्देशून त्यांनीं लिहिलेल्या खालील ओळी किती सार्थ आणि सुंदर आहेत—

'शब्दाशब्दाच्या घटांतून ओसंडे भाव
पारिजातकांच्या कळ्यांचा कोमल वर्षाव

हृदयांतील रणें जाहलीं क्षणामधें शांत
आणि विस्मृतीच्या नाहली चांदण्यांत रात'

'स्वप्नाची समाप्ति' हें अतिसुंदर प्रेमगीत म्हणजे कुसुमाग्रजांच्या कल्पकतेनें कांठोकांठ भरलेला अमृतकलश आहे. ही कविता कितीही वाचली तरी रसिकमनाची तृप्ति होणार नाहीं आणि तिच्यांतली ती ओळ तर जणूं कांहीं एखाद्या सुंदर देवालयाचा सोनेरी कळसच—

'काढ सखे गळ्यांतील तुझे चांदण्याचे हात'

इतकें कोमल वर्णन करणारा कवि सळसळत येणाऱ्या नागाचें वर्णन कसें करतो तें पहा—

'कधिं लवचिक पातें खड्गाचें लवलवतें
कधिं वज्र धरेवर गगनांतुनि कडकडतें
कधिं गर्भरेशमी पोत मधें जरतार
प्रमदेचें मादक वस्त्र जणूं सळसळतें'

या ऐटदार चित्रणानंतर 'गोदाकांठचा संधिकाल' या वातावरणात्मक कवितेकडे वळलें कीं कवीच्या कल्पकतेचें अधिकच कौतुक वाटूं लागतें. या उदासरम्य वातावरणाचें तो असें वर्णन करतो—

'वाडा पडका नदातटावर
भग्न अपुल्या प्रतिबिंबावर
गंगेमधल्या खिन्नपणानें लावितसे दृष्टि.
पाचोळ्यावर कांहीं सळसळ
कसली डोहावरती खळबळ
पाउल वाजे रजनीचें का येतांना जगतीं!'

अशा अभिजात व अष्टपैलू कल्पकतेमुळेंच 'स्मृति' (पृ. २०), 'तरीही केधवां' (पृ. ३२), 'आस' (पृ. ४०), 'पृथ्वीचें प्रेमगीत' (पृ. ४४), 'शेवटचें पान' (पृ. ५६), 'प्रीतीविण' (पृ. ६१), 'प्रतीक्षा' (पृ. ६७), 'आश्वासन' (पृ. ६९), 'कुतूहल' (पृ. ८०) इत्यादि सुरस प्रेमगीतेंही कुसुमाग्रज लिहूं शकले. त्यांचीं हीं गीतें विपुल नसलीं तरी विविध आहेत. त्यांत विरहाची तळमळ आहे, स्मृतीचें समाधान आहे, प्रीतीनें पराक्रमाच्या आड येऊं नये ही उत्कट इच्छा आहे, प्रियजनांकरितां त्यागाची तयारी आहे आणि प्रीति ही क्रीडा मानून भोळ्याखुळ्या जीवांना खेळविणाऱ्या आणि मातीला मिळविणाऱ्या मस्तीचेंही चित्रण आहे. या प्रेमगीतांतल्या खालील ओळी रसिकांच्या नेहेमींच खेळत राहतील—

'प्रीतीस नको तख्त—नको ताजमहाल
प्रीतीस हवी प्रीति—वृथा खंत कशाला ?'

पृथ्वी आपल्या प्रेमगीतांत सूर्याला सांगते—

'परी भव्य तें तेज पाहून पूजून
घेऊं गळ्याशीं कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे !'

रसाळ द्राक्षांचा घोस हातांत घेतल्यावर तो संपेपर्यंत कधीं कुणी थांबला आहे का ? गोदावरीच्या पवित्र परिसरांत वाढलेल्या या प्रतिभासंपन्न कवीचा हा संग्रहही तितक्याच आतुरतेनें रसिक वाचतील अशी माझी खात्री आहे. 'आतां द्राक्षांच्या पिकलेल्या घोसांतहि एखादें द्राक्ष आंबट दिसतें किंवा एखादें टोकाला कुठें तरी लागलेलें असतें.' कुसुमाग्रजांच्या काव्यांतही असे लहानसहान अनेक दोष आहेत. क्वचित् दोन विसंगत कल्पनांचा संकर आढळेल, कुठें तरी वृत्ताचें नांव देतांना किंवा मात्रा मोजतांना दुर्लक्ष झालेलें दिसून येईल, अधूनमधून ऱ्हस्वदीर्घांची केलेली ओढाताण कर्णकटु वाटेल आणि कांहीं थोड्या कविता रसपरिपोषाच्या अभावीं फारशा आकर्षक वाटणार नाहींत. पण या किरकोळ दोषांचें प्रदर्शन करण्याला आतां जागाच उरली नाहीं; आणि ती उरली असती तरी त्याविषयीं अधिक चर्चा करण्यांत स्वारस्य नाहीं. समुद्राच्या फेंसाळलेल्या लाटांवर गवताच्या काड्या नेहमींच तरंगत असतात. परंतु समुद्रांतून प्रवास करणाऱ्यांचें लक्ष त्या काड्यांकडे असत नाहीं. तो लाटांचा पाठशिवणीचा खेळ पाहण्यांतच गुंग होऊन जातो.

टिळक, तांबे किंवा यशवंत यांच्या काव्यांत जीवनांतल्या अनुभवांचीं जेवढीं विविध प्रतिबिंबें पडलीं आहेत तेवढीं या संग्रहांत आढळणार नाहींत हें खरें; पण ही उणीव स्वाभाविकच आहे. अजून 'कुसुमाग्रज' जीवनाच्या उंबरठ्यावरच उभे आहेत. ते जसजसे त्याच्या अंतरंगांत प्रवेश करतील, तसतसें त्यांच्या काव्यविषयांचें वैचित्र्य वाढेल. त्यांची प्रतिभा ही लुकलुक करणारी चांदणी नाहीं; ती चमचम करणारी बिजली आहे. जीवनाच्या

आकाशाचा कोपरान् कोपरा ती उद्यां उजळूं शकेल.' आपली कविता ही मुरली नाहीं, ती तरवार आहे याची योग्य जाणीवही त्यांना आहे. या तरवारीला कल्पकतेच्या सुंदर आणि बळकट मुठीची जोडही सुदैवानें मिळालेली आहे. त्यामुळें 'अनुभूतीच्या कुठल्याहि प्रदेशांत त्यांची प्रतिभा रणरागिणीच होईल!' उमरखय्यामपासून मार्क्सपर्यंत जगांत होऊन गेलेल्या अनेक कलावंतांचे व द्रष्ट्यांचे संस्कार त्यांच्या प्रतिभेवर झाले असले तरी ते त्यांनीं पचविले आहेत—आत्मसात् केले आहेत. त्यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह मराठी कवितेचें एक भूषण मानला जावा इतका सरस आहे!

वाङ्मयीन मूल्यांचा काथ्याकूट करणारे या संग्रहांत हवे तेवढे दोष काढोत, शेक्सपिअरचे तीनशें टीकाकार वाचून हल्लीचें मराठी वाङ्मय निःसत्त्व आहे असा आक्रोश करणारे प्राध्यापक या संग्रहाविषयीं कांहींहि म्हणोत, रसिक महाराष्ट्रीय जनता काव्यप्रांतांतल्या पुढल्या प्रवासांतहि खालील ओळी गात रहा अशीच कुसुमाग्रजांना विनंति करील.

' कोट्यवधी जगतांत जिवाणू जगती अन् मरती
जशीं तीं गवताचीं पातीं
नाविक आम्ही परंतु फिरतों सात नभांखालीं
निर्मितों नव क्षितिजें पुढतीं.

चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरतीं
कथा या खुळ्या सागराला
' अनंत अमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला ! ','

खासबाग, कोल्हापूर.
ता. १-३-४२

वि. स. खांडेकर

## दूर मनोऱ्यांत

(जाति : चंद्रकांत)

वादळला हा जीवनसागर—अवसेची रात
पाण्यावर गडबडा लोळतो रुसलेला वात

भांबावुनि अभ्रांच्या गर्दीत गुदमरल्या तारा
सूडानें तडतडा फाडतो उभें शीड वारा

पिंजुनिया आयाळ गर्जती लाटा भंवतालीं
प्रचण्ड भिंगापरि फुटतें जळ आदळुनी खालीं

प्रवासास गल्बतें आपुलीं अशा काळरातीं
वावटळींतिल पिसांप्रमाणें हेलावत जाती.

परन्तु अन्धारांत चकाके बघा बन्दरांत
स्तम्भावरचा प्रकाश हिरवा तेजस्वी शान्त !

किरणांचा उघडून पिसारा देवदूत कोणी
काळोखावर खोदित बसला तेजाचीं लेणीं

उज्ज्वल त्याची पहा प्रभावळ दूर मनोऱ्यांत
अन् लावा हृदयांत सख्यांनो, आशेची वात !

पुणें १९३७

## हिमलाट

( जाति : द्राक्षकन्या )

हिमलाट पहांटे पहा जगावर आली !
मुखिं पिळून मद्यास्तव द्राक्षांचे घोस
पाडीत मळे मोत्यांचे चरणीं ओस
उद्दाम धावते करित दुभङ्ग धरेस
करकरां पांखरें रगडी दांताखालीं
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

श्रीमन्त महालीं तिथें हिला ना थारा
मखमाली दुलया देती मधुर उबारा
डोकावुन पळते कांपत हीच थरारा
हो काय दरारा कनकाचा भयशाली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

पाहून परन्तु कुठें कुडाचीं खोपीं
कंगाल कांबळीं टाकुन गेले झोंपी
शेंकडों कवाडे ! वाट जावया सोपी
कडकडून पडते तेथें लांव भुकेली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

ज्योतींतुनि धावत या तेज:कण सारे
या यज्ञांतिल अन् सरणांतील निखारे
रे ढाळ नभा, तव ते ज्वालामय तारे
पेटवुं द्या वणवा कणकणांत मशाली
हिमलाट पहांटे पहा जगावर आली !

नाशिक १९३६

## स्वप्नाची समाप्ति

( छंद : पादाकुलक )

स्नेहहीन ज्योतीपरी
मंद होई शुक्रतारा
काळ्या मेघखंडास त्या
किनारती निळ्या धारा.

स्वप्नासम एक एक
तारा विरे आकाशांत
खिरे रात्र कणकण
प्रकाशाच्या सागरांत !

काढ सखे, गळ्यांतील
तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
उभे दिवसाचे दूत !

रातपाखरांचा आर्त
नाद नच कानीं पडे
संपवुनी भावगीत
झोंपलेले रातकिडे !

पहांटचे गार वारे
चोरट्यानें जगावर
येती, पाय वाजतात
वाळलेल्या पानांवर

शांति आणि विषण्णता
दाटलेली दिशांतुन

गजबज गर्जवील
   जग घटकेनें दोन !

जमूं लागलेलें दंव
   गवताच्या पातीवर
भासते भू तारकांच्या
   आसवांनीं ओलसर !

काढ सखे, गळ्यांतील
   तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
   उभे दिवसाचे दूत

प्राजक्ताच्या पावलाशीं
   पडे दूर पुष्प–रास
वाऱ्यावर वाहती हे
   त्याचे वाढलेले श्वास !

ध्येय, प्रेम, आशा यांची
   होतसे का कधीं पूर्ती !
वेड्यापरी पूजतों या
   आम्ही भंगणाऱ्या मूर्ती

खळ्यामध्यें बांधलेले
   बैल होवोनिया जागे
गळ्यांतील घुंगुरांचा
   ध्वनि कानीं येऊं लागे.

आकृतींना दूरच्या त्या
   येऊं लागे रूप–रङ्ग

हालचाल कुजबूज
    होऊं लागे जागोजाग

काढ सखे, गळ्यांतील
    तुझे चांदण्याचे हात
क्षितिजाच्या पलिकडे
    उभे दिवसाचे दूत.

होतें म्हणूं स्वप्न एक
    एक रात्र पाहिलेलें
होतें म्हणूं वेड एक
    एक रात्र राहिलेलें !

प्रकाशाच्या पाउलांची
    चाहूल ये कानावर
ध्वज त्याचे कनकाचे
    लागतील गडावर.

ओततील आग जगीं
    दूत त्याचे लक्षावधी
उजेडांत दिसूं वेडे
    आणि ठरूं अपराधी !

नाशिक १९३६

## ग्रीष्माची चाहूल

( जाति : नववधु )

हें काय अनामिक आर्त पिसें
हुरहूर अकारण वाटतसे !

कांति जगावर अभिनव शिंपित
चराचरांतुन फुलवित जीवित
वसंत ये जगिं गाजत वाजत

कां अभ्र अवेळीं दाटतसे !

नवा फुलोरा नव पर्णावलि
हिमशीतल चहुंकडे सावली
जीवनगंगा जगिं अवतरली

तरि उदास मानस होई कसें !

दिशा दिशा या उज्ज्वल मंगल
आम्रांतुनि ललकारति कोकिल
दुमदुमतो वनिं तो ध्वनि मंजुल

मनिं रात्रिंचर कां कण्हत असे !

सरेल किंवा वसन्त म्हणुनी
सुकतिल कुसुमाकुल पुष्करणी
करपुनि जाइल अवघी धरणी

ती आंच अगोदर भासतसे !

अग्नीचा घट खांद्यावरती—
घेउन, अग्नी पेरित भंवती
ग्रीष्म निघाला येण्या जगतीं

चाहूल तयाची लागतसे !

हें काय अनामिक आर्त पिसें

नाशिक १९३४

## अहि—नकुल

( जाति : द्राक्षकन्या )

ओतीत विखारी वातावरणीं आग
हा वळसे घालित आला मन्थर नाग,
मधुनीच उभारी फणा, करी फूत्कार
ये ज्वालामुखिला जणूं अचानक जाग !

कधिं लवचिक पातें खड्गाचें लवलवतें,
कधिं वज्र धरेवर गगनांतुन कडकडतें,
कधिं गर्भरेशमी पोत मधें जरतार,
प्रमदेचें मादक वस्त्र जणूं सळसळतें !

मार्गावर याच्या लवत तृणाचीं पातीं
पर्णावर सुमनें मोडुनि माना पडतीं
थरथरतीं झुडपें हादरती नववेली
जणुं गुलाम सारे या सम्राटापुढतीं !

चालला पुढें तो—काय ऐट ! आनंद !
अग्नीचा ओघळ ओहळतो जणु मंद,
टाकली यमानें कट्यार वा कनकाची
चालली वळींचा वेध घेत ही धुंद !

वा ताण्डव करतां सोम प्राशुनी काली—
रक्तांत नाहली, शिरमुंडावळ भालीं,
थयथयां नाचतां नरड्यांवर प्रेतांच्या,
हें कंकण निखळुनि पडलें भूवर खालीं !

चालला पुढें तो लचकत मुरडत मान,
अवतरे मूर्तिमान् मल्हारांतिल तान !
चांचल्य विजेचें, दर्याचें गांभीर्य
चालला मृत्युचा मानकरीच महान !

हां थांब ! कुणाची जाळिमधें चाहूल
अंगार—कणापरि नयन कुणाचें लाल,
आरक्त ओठ ते ध्वजा जणूं रक्ताच्या,
रे नकूल आला ! आला देख, नकूल !

थबकलाच जागीं सर्प घालुनी वळसा,
रिपु समोर येतां सोडुनि अन् आडोसा,
भूमीस मारुनी मागें तीव्र तडाखा,
घे फणा उभारून मरणाचा कानोसा !

पडलीच उडी ! कीं तडितेचा आघात !
उल्केपरि तळपत कण्यांत घुसले दांत,
विळख्यावर विळखे कसून चढवी सर्प,
फुंफाट करी अन् पिशापरी त्वेषांत !

रण काय भयानक, लोळे आग जळांत !
आदळती, वळती, आवळती क्रोधांत,
जणुं जिंकायासी गगनाचें स्वामित्व
आषाढ—घनांशीं झुंजे वादळ—वात !

क्षणिं धुळींत गेली वहात ती विषधार,
शतखंडित झालें तें गर्वोन्नत ऊर,

विच्छिन्न तनूंतुनि उपसुन काढुनि दांत
वाऱ्यापरि गेला नकुल वनांतुनि दूर !

संग्राम सरे, रक्ताचे ओघळ जाती,
आनंदें न्हाती त्यांत तृणाचीं पातीं,
पिंजून कापसापरी पडे तो नाग,
ते खंड गिळाया जमले कीटक भोंतीं !

पुणें १९३८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ........ वि. ........
क्रमांक ........ नों. दि. ........


## किनाऱ्यावर

( जाति : पादाकुलक )

पुढें पसरला अथांग दरिया
सखे, किनाऱ्यावरती आपण

कोर शशीची शुभ्र बिलोरी
टाकी निज किरणांचीं रापण !

चित्रासम निःशब्द गमे जग
प्रकाश—काळोखाचा संगम

क्वचित भंगते गाढ शान्तता
जातां झापुन रात्र—विहंगम.

दूर तमांतुन दिसती अंधुक
नगरांतिल त्या ज्योती तेवत

संसारांतिल समूर्त दुःखें
बसलेलीं वा जागत, जाळत !

क्षितिजावर दीपांकित तारूं
चाले पश्चिम दिशेस धूसर

ज्योतींचा जणुं जथा निघे हा
शोधाया मावळला भास्कर !

हळुहळु खळबळ करीत लाटा
येउनि पुळणीवर ओसरती

जणूं जगाचीं जीवन—स्वप्नें
स्फुरतीं, फुलतीं, फुटतीं, विरतीं !

होय किनाऱ्यावरतीं अपुलें
आज सखे, हें मङ्गल मीलन !

जीवित दर्यापरी, नसें तें—
केवळ सुंदर, केवळ भीषण !

मुंबई १९३६

## अवशेष

( जाति : पादाकुलक )

माला स्वप्नांची ओघळली !
    जपलीं ध्येयें जीं हृदयाशीं
    गमलीं मजला जीं अविनाशी
    कोसळुनी तीं जमल्या राशी
अवशेषांच्या या भंवताली.

रवि येतां क्षितिजावर वरती
    दंवापरी विरल्या आकांक्षा
    जागींच जिरल्या मनीं जिगीषा
    हांसत झाकुनि त्या अवशेषा
करणें आहे प्रवास पुढतीं.

वास्तव जगताच्या हेमन्तीं
    स्वप्नांचा उत्फुल्ल फुलोरा
    ढाळि तळाला वादळ-वारा,
    रात्रीच्या त्या प्रदीप्त तारा
कांचेचे कण आतां गमती.

पण अद्यापी स्मृतिचे धागे
    गुन्तुन मागें जिवा ओढती
    अद्यापी त्या विझल्या ज्योती
    कधिं एखाद्या भकास रातीं
पहांट ये तों ठेवति जागे.

दृश्यें मोहक अद्यापी तीं
स्वप्नामध्यें समूर्त होतीं
थडग्यामधुनी छाया उठती
धरावया जों जावें पुढतीं
थडग्यामध्यें विलीन होती.

वसन्त सरला, सरलें कूजन
सरलें तें कुसुमांकित नंदन
सरलें आर्त उराचें स्पंदन
मूर्तीवरील मुलामा जाउन
सरलें आतां मूर्तीपूजन.

## मातीची दर्पोक्ति

(जाति : द्राक्षकन्या)

घनधार मृगाचा प्राशुनिया पर्जन्य
त्या तृषार्त भूवर आलें नव चैतन्य,
उन्माद चढे, तो दर्प दर्वळे भोंतीं

थरथरा कांपलीं वर दर्भांचीं पातीं
ते सुस्त धूलिकण गाउं लागले गीत
कोलाहल घुमला चहूंकडे रानांत :

अभिमानी मानव ! आम्हाला अवमानी !
बेहोष पाउलें पडतीं अमुच्यावरुनी
त्या मत्त पदांना नच जाणीव अजूनी

कीं मार्ग शेवटीं सर्व मातिला मिळती
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

प्रासाद भिडूं द्या गगनाला गर्वांत
डोलुं द्या पताका सत्तेच्या उन्मत्त
दौलती उठूं द्या प्राशुनि दुर्बळ रक्त

कोसळेल इमला समूळ एका रातीं
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

दर्पणीं पाहुं द्या रमणि रूप दर्पांत
वा बाहु स्फुरुं द्या बलशाली समरांत
पांडित्य मांडुद्या शब्दांचा आकांत

तें रूप, बुद्धि ती, शक्ति, आमुची भरती,
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

कित्येक शिकंदर जग जिंकुनियां गेले
कित्येक वाल्मिकी अखेर इकडे आले
कित्येक मनू अन् मुनी धुळीनें गिळले

'स्मृति' तीलहि त्यांच्या ओळी अंधुक होती
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

पाहून हासुं ये तुमचे ताजमहाल
अन् गर्व किती तो ! काल काय जिंकाल ?
शेंकडों ताजही जिथें शोभले काल

तीं प्रचंड नगरें आज आमुच्या पोटीं
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

धनवंत असूं द्या, असुंद्या दीन भिकारी
कुणि संत असुं द्या वा पापी व्यभिचारी
इकडेच वहाते सर्वांची रहदारी

हो भस्म चितेवर सारी नीति–अनीति
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

मरणोत्तर वाटे होइल आशापूर्ति
स्वर्गीय मंदिरें घ्यायाला विश्रांति
लाभेल प्रभूची वा प्रमदांची प्रीति

त्या व्याकुळ मतिला इथेंच अंतिम शांति
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

हीं क्षुद्र बाहुलीं कोण करी निर्माण ?
बेताल नाचवी, सूत्रधार हा कोण ?
मातींतच अंतीं त्याचेंही निर्वाण ?

स्वामित्व जगाचें अखेर अमुच्या हातीं
मातीवर चढणें एक नवा थर अंतीं !

नाशिक १९३५

## गोदाकांठचा संधिकाल (जाति : अंजनी)

गर्द वनीं वा गिरीकंदरीं
लपलेला दिनिं तम, गरुडापरि
पंख आपुले विशाल पसरुन ये विश्वावरती.

पश्चिम—वारा वाहे झुळझुळ
कंपित होउनि हेलावें जळ
दूर तरूंच्या काळ्या छाया हळुहळु थरथरती

जीर्ण वडाच्या पारंब्यांतुनि
पंखांची क्षण फडफड करुनी
शब्द न करतां रातपांखरें नदीकडे उडतीं.

कपारींत अन् दूर कुठोनी
सांदीमध्यें लपुनी बसुनी
अखंड काढी रातकिडा स्वर ते कानीं पडती.

वळणाच्या वाटेवर चाले,
आतुर अंतर, कातर डोळे,
झपझप पाउल टाकित कोणी खेड्यांतील युवती

निळसर काळें वरती अंबर,
धूसर धूराच्या रेषा वर
पलिकडच्या घन राईमधुनी चढुनी मावळती.

अभ्रखंड तो अचल पांढरा,
पडे पारवा झडुनि पिसारा;
तेजहीन अन् दोन चांदण्या डोकावुन बघती.

परि शुक्राचा सतेज तारा
पसरित गगनीं प्रकाश–धारा
वीरापरि आत्मार्पण करण्या आलेल्या पुढती.

आणिक इकडे क्षितिजावरती
विडंबण्या शुक्राची दीप्ती
शहरामधल्या क्षीण दिव्यांच्या मिणमिणती ज्योति.

वाडा पडका नदीतटावर
भग्न आपुल्या प्रतिबिंबावर
गंगेमधल्या, खिन्नपणानें लावितसे दृष्टि.

देउळ तें अन् भग्न, हटानें
ध्येयनिष्ठ जणुं जनाप्रमाणें
पडलें तरिही जपुनी ठेवी हृदयांतिल मूर्ति.

पाचोळ्यावर कां ही सळसळ
कसली डोहावरती खळबळ
पाउल वाजे रजनीचें का येतांना जगतीं ?

नाशिक १९३३

## स्मृति

नवलाख तळपती दीप विजेचे येथ
उतरलीं तारकादळें जणू नगरांत
परि स्मरते आणिक करते व्याकुळ केंव्हां
त्या माजघरांतिल मंद दिव्याची वात !

वाऱ्यावर येथिल रातराणि ही धुंद
टाकतां उसासे, चरणचाल हो मन्द
परि स्मरतो आणिक करतो व्याकुळ केंव्हां
त्या परसामधला एकच तो निशिगन्ध !

हेलावे भंवतीं सागर येथ अफाट
तीरावर श्रीमान् इमारतींचा थाट
परि स्मरतो आणिक करतो व्याकुळ केंव्हां
तो नदीकिनारा आणि भंगला घाट !

बेहोष चढे जलशांना येथिल रंग
रुणझुणतां नूपुर जीव बने निःसंग
परि स्मरतो आणिक करतो व्याकुळ केंव्हां
तूं आर्त मला जो ऐकविलास अभंग !

लावण्यवतींचा लालस येथ निवास
मदिरेंत माणकापरी तरारे फेस
परि स्मरती आणिक करती व्याकुळ केंव्हां
ते उदास डोळे, त्यांतिल करुण—विलास !

मुंबई १९४६

## हा कांठोकांठ कटाह भरा—

(जाति : नववधु)

या त्रिभुवन उजळित प्रभाकरा,
हा कांठोकांठ कटाह भरा !

रक्तध्वज पूर्वेवर चढुं द्या,
खोप्यांतिल खग नभीं उडूं द्या,
आकाशांत निखारा फुटुं द्या,

ज्वालांत जळूं द्या तम सारा,
हा कांठोकांठ कटाह भरा !

स्वप्नांपरि ढग धूसर सुंदर
किनारती कोनांतुन अम्बर,
ओतुनि अपुली आग तयांवर

त्या स्वप्नांचा संहार करा !
हा कांठोकांठ कटाह भरा !

रातकिडा सांदींत पडूं दे,
जीर्ण गडांतिल घूक रडूं दे,
गिरीगुहांतिल पशू कण्हूं दे,

कां तमा तयांची प्रभूवरा !
हा कांठोकांठ कटाह भरा !

वेताळाचे उठोनिया गण
चितेभोंवतीं धरून रंगण
स्मशान—भूवर करिती नर्तन,

द्या मुक्ति महंता, निशाचरां !
हा कांठोकांठ कटाह भरा !

नभिं लागे तारांचें मोहळ,
भुलवी त्यांची क्षणिक प्रभावळ,
रात्रीचे हे आश्रित केवळ,

ही मशाल त्यावर धरा जरा.
हा कांठोकांठ कटाह भरा !

नको चंद्र वा नको चांदणें,
सुखमय आभासांत रहाणें,
कणाकणावर पसरुन किरणें

यज्ञांत शुद्ध ही करा धरा !
हा कांठोकांठ कटाह भरा !

पुणें १९३८

## आगगाडी व जमीन

( छन्द : जीवनलहरी )

नको ग ! नको ग !
आक्रंदे जमीन
पायशीं लोळत
विनवी नमून—

धांवसी मजेंत
वेगांत वरून
आणिक खालीं मी
चाललें चुरून !

छातींत पाडसी
कितिक खिंडारें
कितिक ढाळसी
वरून निखारे !

नको ग नको ग
आक्रंदे जमीन
जाळींत जाऊं तूं
बेहोष होऊन

ढगात धुराचा
फवारा सोडून
गर्जत गाडी ती
बोलली माजून—

दुर्बळ ! अशीच
खुशाल ओरड
जगावें जगांत
कशाला भेकड !

पोलादी टांचा या
छातींत रोवून
अशीच चेंदत
धावेन ! धावेन !

चला रे चक्रांनो,
फिरत गरारा
गर्जत पुकारा
आपुला दरारा !

शीळ अन् कर्कश
गर्वांत फुंकून
पोटांत जळतें
इंधन घालून

शिरली घाटांत
अफाट वेगांत
मैलांचें अन्तर
घोटांत गिळीत !

उद्दाम गाडीचें
ऐकून वचन

क्रोधांत इकडे
थरारे जमीन

“ दुर्बळ मेकड ! ”
त्वेषानें पुकारी
घुमले पहाड
घुमल्या कपारी !

हवेंत पेटला
बुडाचा धुमारा
कोसळे दरींत
पुलाचा डोलारा !

उठला क्षणार्ध
भयाण आक्रोश
हादरे जंगल
कांपलें आकाश

उलटी पालटी
होऊन गाडी ती
हजार शकलें
पडलीं खालतीं !

## क्रांतीचा जयजयकार (जाति : मिश्र चंद्रकांत)

[ अन्नत्याग करून मृत्यूच्या दारांत पाऊल टाकतांना राजबंद्यांच्या ओठावर असलेंच गाणें स्फुरलें नसेल काय ? ]

गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार
अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार !
खळखळूं द्या या अदय शृंखला हातापायांत
पोलादाची काय तमा मरणाच्या दारांत ?
सर्पांनो उद्दाम, आवळा कसूनिया पाश
पिचेल मनगट परी उरांतिल अभंग आवेश
तडिताघातें कोसळेल का तारांचा संभार
कधींही तारांचा संभार
गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार

क्रुद्ध भूक पोटांत घालुं द्या खुशाल थैमान
कुरतडुं द्या आंतडीं करूं द्या रक्ताचें पान
संहारक काली, तुज देती बळीच आव्हान
बलशाली मरणाहुन आहे अमुचा अभिमान
मृत्युंजय आम्ही ! आम्हाला कसलें कारागार ?
अहो हें कसलें कारागार ?
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हातीं
होउनिया बेहोष धावलों ध्येयपथावरतीं
कधिं न थांबलों विश्रांतीस्तव, पाहिलें न मागें
बांधुं न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे

एकच तारा समोर आणि पायतळीं अंगार
होता पायतळीं अंगार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

श्वासांनो, जा वायूसंगें ओलांडुन भिंत
अन् आईला कळवा अमुच्या हृदयांतिल खंत
सांगा वेडीं तुझीं मुलें हीं या अंधारांत
बद्ध करांनीं अखेरचा तुज करती प्रणिपात
तुझ्या मुक्तिचें एकच होतें वेड परी अनिवार
तयांना वेड परी अनिवार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

नाचवितां ध्वज तुझा गुंतले शृंखलेंत हात
तुझ्या यशाचे पवाड गातां गळ्यांत ये तात
चरणांचें तव पूजन केलें म्हणुनि गुन्हेगार
देतां जीवन–अर्घ्य तुला ठरलों वेडेपीर
देशिल ना पण तुझ्या कुशीचा वेडयांना आधार
आई, वेडयांना आधार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

कशास आई, भिजविसि डोळे उजळ तुझें भाल
रात्रीच्या गर्भांत उद्यांचा असे उष:काल
सरणावरतीं आज आमुचीं पेटतांच प्रेतें
उठतिल त्या ज्वालांतुन भावी क्रांतीचे नेते
लोहदण्ड तव पायांमधले खळाखळा तुटणार
आई, खळाखळा तुटणार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

आतां कर ओंकारा, तांडव गिळावया घांस
नाचत गर्जत टाक बळींच्या गळ्यावरी फांस
रक्तमांस लुटण्यास गिधाडें येऊं देत क्रूर
पहा मोकळें केलें आतां त्यासाठीं ऊर ।।
शरिरांचा कर सुखेनैव या सुखेनैव संहार
मरणा, सुखेनैव संहार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार !

पुणें १९३९

## जालियनवाला बाग

( जाति : चन्द्रकांत )

रक्ताचे नच ओघळ सुकले अजुनि क्रुसावरचे
विरले ना ध्वनि तुझ्या प्रेषिता, अजुनी शब्दांचे
मंगल तव गीतांचा होतो मंदिरांत घोष—
" प्रेम, शांति अन् क्षमा यांमधें वसतो परमेश ! "

आणि आज हे तुझ्या पताका ज्यांच्या हातांत
नि:शस्त्रांच्या रक्तामांसामधें नाहतात !
मर्दांच्या बंदुका उडाल्या मुलाबायकांत !
जगजेत्यांच्या पराक्रमाची स्फूर्तिप्रद रीत !

पाचोळ्यापरि पडली पाहुन प्रेतांची रास
नयन झांकले असशिल देवा, तूं अपुले खास;
असेल ही वा सैतानाची प्रभूवरी मात
एक जखम अन् नवीन येशू, तुझ्या काळजांत !

नाशिक १९३६

## जा जरा पूर्वेकडे (गझल : भ्रांत)

[ चीन–जपानी युद्धांत चाललेले राक्षसी
अत्याचार या कवितेंत अभिप्रेत आहेत. ]

जा जरा पूर्वेकडे !
वाळवण्टीं कोरतां कां एक श्वानाचें मढें ?
जा गिधाडांनो, पुढें
जेथ युद्धाची धुमाळी गंज प्रेतांचा पडे,
जा जरा पूर्वेकडे !
आणि रक्ताच्या नद्या हो वाहती धारोष्णशा
भागवा तेथें तृषा,
ढीग साराया शवांचा तेथ लागे फावडें,
जा जरा पूर्वेकडे !
गात गीतें जाऊं द्या हो थोर तांडा आपुला,
देव आहे तोषला,
वर्षतां त्याचा दयाब्धी राहतां कां कोरडे ?
जा जरा पूर्वेकडे !
तेथ देखा आग वेगानें विमानें वर्षती,
थोर शास्त्रांची गती !
धूळ आणि अग्नि यांच्या दौलती चोंहीकडे !
जा जरा पूर्वेकडे !

खड्ग लावूनी उराला बायकांना वेढती,
आणि दारीं ओढती,
भोगती बाजार–हाटीं मांस आणि कातडें !
जा जरा पूर्वेकडे !

आर्त घावा आइचा ऐकून धावे अर्भक
ना-जुमानी बंदुक
आणि लोंबे संगिनीला छान छोटें आंतडें !
जा जरा पूर्वेकडे !

हा दयेनें ईश्वराच्या काळ आहे चालता,
व्यर्थ येथें राबतां,
व्यर्थ तेथें शोणिताचे वाहुनी जाती सडे !
जा जरा पूर्वेकडे !

आणि येतांना पवाडे संस्कृतीचे गा जरा,
डोळ्ं द्या सारी धरा,
मेघमालेंतून आम्हा शांततेचे द्या धडे !
जा जरा पूर्वेकडे !

पुणें १९३८

## तरीही केधवां—

( छंद : जीवनलहरी )

दोघांत आजला
अफाट अन्तर
जुळून पाकळ्या
उडाल्या नंतर—

जीवनाव्रांचून
जळला अंकुर
प्रश्नहि राहिला
राहिलें उत्तर !

संग्रामीं आजला
शोधतों जीवित
उरींचे ओघळ
दाबून उरांत—

उठती भोंवती
धुळीचे पर्वत
अखण्ड फिरते
वरून कर्वत !

वादळी रणांत
करणें कोठून
नाजूक भावांचें
लालनपालन—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: काव्य ........



तरीही केधवां
पडतां पथारी
थडगीं दुभंग
होतात अन्तरीं—

आठवे तुझ्या तें
प्रीतीचें मोहळ
आणि हो बिछाना
आगीचा ओहळ !

मुंबई १९३७

## मूर्ति-भंजक

( छंद : जीवनलहरी )

जगाचा गल्बला
जगांत सोडून
प्रेमाचीं मृणाल—
बंधनें तोडून—

होता तो भ्रमिष्ट
भ्रमत एकला
नादांत अगम्य
टाकीत पावलां !

वर्तलें नवल
डोंगर-कपारीं
गवसे प्रतिमा
संगमरवरी !

हर्षाचा उन्माद
आला त्या वेडयाला
घेऊन मूर्ति ती
बेहोष चालला,

आढळे पुढती
पहाड उभार
वेडयाच्या मनांत
कांहीं ये विचार

थांबवी आपुला
निरर्थ प्रवास
दिवसामागून
उलटे दिवस—

आणिक अखेरीं
राबून अखण्ड
वेडयानें खोदलें
मंदिर प्रचंड

चढवी कळस
घडवी आसन,
जाहली मंदिरीं
मूर्त ती स्थापन !

नंतर सुरू हो
वेडयाचें पूजन !
घुमतें कडयांत
नर्तन गायन !

रान अन् भोंतीचें
स्फुंदतें सकाळीं
ठेवी हा वेलींना
ना फुल, ना कळी !

विचारी आश्चर्ये
तृणाला ओहळ

कोण हा हिरावी
रोजला ओंजळ ?

परन्तु मूर्त ती
बोलेना, हलेना,
वेडयाचें कौतुक
कांहींही करीना !

सरलें गायन
सरलें नर्तन
चाललें अखेरीं
भीषण क्रंदन

पडून तिच्या त्या
सुन्दर पायाशीं
ओरडे रडे तो
उपाशी तापाशी !

खुळाच ! कळे न
पाषाणापासून
अपेक्षा कशाची
उपेक्षेवांचून !

वैतागे, संतापे,
अखेरीं क्रोधानें
मूर्तीच्या ठिकऱ्या
केल्या त्या भक्तानें !

रित्या त्या मंदिरीं
आतां तो दाराशीं
बसतो शोधत
कांहींसें आकाशीं.

वाटेचे प्रवासी
मंदिरीं येतात
आणिक शिल्पाची
थोरवी गातात.

पाहून परंतु
मोकळा गाभारा
पाषाणखंडांचा
आंतला पसारा—

त्वेषानें बोलती
जातांना रसिक
असेल चांडाळ
हा मूर्तिभंजक !

## कोलंबसाचें गर्वगीत

(जाति : माधवकरणी)

हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीनें त्या
समुद्रा, डळमळुं दे तारे !
विराट वादळ हेलकावुं दे पर्वत पाण्याचे
ढळूं दे दिशाकोन सारे !

ताम्रसुरा प्राशून मातुं दे दैत्य नभामधले
दडूं द्या पाताळीं सविता
आणि तयांची ही अधिराणी दुभंग धरणीला
कराया पाजळूं दे पलिता !

कीं स्वर्गांतून कोसळलेला, सूड—समाधान
मिळाया प्रमत्त सैतान
जमवुनि मेळा वेताळांचा या दर्यावरती
करी हें तांडव थैमान !

पदच्युता, तव भीषण नर्तन असेंच चालूं दे
फुटूं दे नभ माथ्यावरती
आणि तुटूं दे अखंड उल्का वर्षावत अग्नी
नाविकां ना भय वा भीति !

सहकाऱ्यांनो, कां ही खंती जन्म खलाशांचा
झुंजण्या अखंड संग्राम
नक्षत्रापरि असीम नीलामधें संचरावें
दिशांचें आम्हाला धाम !

काय सागरीं तारुं लोटलें परताया मागें
असे का हा अपुला बाणा
त्याहून घेऊं जळीं समाधी सुखें, कशासाठीं
जपावें पराभूत प्राणा !

कोटयवधी जगतांत जिवाणू जगती अन् मरती
जशीं तीं गवताचीं पातीं,
नाविक आम्ही परंतु फिरतों सात नभांखालीं
निर्मितों नव क्षितिजें पुढती !

मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन, ना दारा
घराची वा वितभर कारा !
मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनी खंड खंड सारा !

चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरती
कथा या खुळ्या सागराला
" अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला !

नाशिक १९३६

## आस

(जाति : नववधु)

करि मुक्त विहंगम हा रमणी !
रहावया मज प्रिये, मनोहर
कनकाचा घडविलास पंजर
छतास बिलगे मोत्यांचा सर
या सलत शृंखला तरि चरणीं
करि मुक्त विहंगम हा रमणी !

तुझ्या कराचा विळखा पडतां
तव वक्षाच्या उबेंत दडतां
गमे जिण्याची क्षण सार्थकता
परि अंतरिं करि आक्रोश कुणी
करि मुक्त विहंगम हा रमणी !

नकोस पसरूं मोहक बाहू
मृदुल बंध हे कुठवर साहूं
नभ–नाविक मी कुठवर राहूं
या आकुंचित जागिं गुदमरुनी
करि मुक्त विहंगम हा रमणी !

जावें गगनीं आणिक गावें
मेघांच्या जलधींत नहावें
हिरव्या तरुराजींत रहावें
ही आस सदा अंतःकरणीं
करि मुक्त विहंगम हा रमणी !

नाशिक १९३४

## बळी

(गझल : देवप्रिया)

दूर देशीं राहिलेलें दीन त्याचें झोंपडें !
बापुडा अन् आज येथें पायवाटेला पडे !

शोधण्याला भाकरीचा घांस आला योजनें
आणि अन्तीं मृत्युच्या घांसांत वेडा सांपडे !

लाज झाकाया कटीला लावलेलीं लक्तरें
अन् धुळीनें माखलेलें तापलेलें कातडें !

आर्त डोळ्यांतून सारीं आटलेलीं आंसवें
आंत दावाग्नीच पेटे ओढ घेई आंतडें !

झांकल्या डोळ्यांस होती भास दोहीं लेकरें
हात घालोनी गळ्याला ओढती खोप्याकडे—

नादला झंकार कानीं कंकणांचा कोठुनी
काळजाला तो ध्वनी भिंगापरी पाडी तडे !

भोंवतीचे उंच वाडे क्रूरतेनें हांसती
मत्त शेजारून कोठें आगगाडी ओरडे !

आणि चक्रें चाललीं तीं–हो महालीं गल्बला
चाललाही प्राण याचा, पापणी खालीं पडे !

थांबल्या त्या हालचाली, थांबलें काळीज हो
आणि माशांचा थवा मुद्रेवरोनी बागडे !

ना भुकेचा यापुढें आक्रोश पोटीं चाळणें
याचनेचे दीन डोळे बंद झाले यापुढें !

यापुढें ना स्वाभिमाना लागणें आतां चुडा
अन्तराला आसुडाचे घाव माथीं जोखडें !

मानवांच्या संस्कृतीची काय लागे ही ध्वजा
तीस कोटी दैवतांच्या कीं दयेचें हें मढें !

मूक झालेल्या मुखानें गर्जतें का प्रेत हें
घालिती हे बंद डोळे का निखाऱ्याचे सडे ?

अन् अजूनी हांसती उन्मत्त हो प्रासाद ते
वेग—वेड्या वाहनांचा घोष ये चोंहीकडे !

भेकडांनो, या इथें ही साधण्याला पर्वणी
पेटवा येथें मशाली अन् झडूं द्या चौघडे !

मुंबई १९३७

## लिलांव

( जाति : दिंडी )

उभा दारीं कर लावुनि कपाळा
दीन शेतकरी दावुनी उमाळा,
दूत दारांशीं पुकारी लिलांव,
शब्द कसले ते—घणाचेच घाव !

पोसलेले प्राशून रक्त दाणे
उडुनि जाति क्षणिं पाखरांप्रमाणें,
निघत मागुनि वाजलें आणि थाळी,
गाडग्यांची ये अखेरीस पाळी !

वस्तुवस्तूवर घालुनिया धाड
करित घटकेंतच झोंपडें उजाड !
स्तब्ध बाजूला बसे घरधनीण
लाल डोळ्यांतिल आटलें उधाण;

भुकें अर्भक अन् कवळुनी उरास
पदर टाकुनि त्या घेई पाजण्यास.
ऊर उघडें तें तिचें न्याहळोनी
थोर थैलींतिल वाजवीत नाणीं—

" आणि ही रे ! " पुसतसे सावकार,
उडे हास्याचा चहुंकडे विखार !

नाशिक १९३४

## पृथ्वीचें प्रेमगीत

(वृत्त : सुमंदारमाला)

युगामागुनी चालली रे युगें ही
 करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेंत धावूं तुझ्या मी
 कितीदां करूं प्रीतिची याचना !

नव्हाळींतले ना उमाळे, उसासे
 न ती आग अंगांत आतां उरे
विझूनी अतां यौवनाच्या मशाली
 उरीं राहिले काजळी कोपरे !

परी अंतरीं प्रीतिची ज्योत जागे
 अविश्रांत राहील अन् जागती;
न जाणें न नेणें कुठें चाललें मी
 कळे तूं पुढें आणि मी मागुती !

दिमाखांत तारे नटोनी थटोनी
 शिरीं टाकिती दिव्य उल्का-फुलें
परंतु तुझ्या मूर्तिवांचून देवा,
 मला वाटतें विश्व अंधारलें !

तुवां सांडलेले कुठें अंतराळांत
 वेंचूनिया दिव्य तेज:कण
मला मोहवाया बघे हा सुधांशु
 तपाचार स्वीकारुनी दारुण.

पिसारा प्रभेचा उभारून दारीं
  पहांटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाजुनी लाल—
  होउनिया लाजरा मंगळ.

निराशेंत संन्यस्त होऊन बैसे
  ऋषींच्या कुळीं उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारुनी हा
  करी धूमकेतू कधीं आर्जव !

परी भव्य तें तेज पाहून पुजून
  घेऊं गळ्याशीं कसे काजवे !
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
  तुझी दूरता त्याहुनी साहवे !

तळीं जागणारा निखारा उफाळून
  येतो कधीं आठवानें वर
शहारून येतें कधीं अंग, तूझ्या—
  स्मृतीनें उले अन् सले अन्तर !

गमे कीं तुझ्या रुद्र रूपांत जावें
  मिळोनी गळां घालुनीया गळा
तुझ्या लाल ओंठांतली आग प्यावी
  मिठीनें तुझ्या तीव्र व्हाव्या कळा !

अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्
  मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
  धुळीचेंच आहे मला भूषण !

## गुलाम

(जाति : भूपति)

घणघणतीं चक्रें प्रचंड आक्रोशांत
फिरतात पिसाटापरी धुंद वेगांत !

अणुअणूस आलें उधाण वातावरणीं
जणुं विराट स्थंडिल फुलवी वादळवात !

तो गुलाम होता उभा अधोमुख तेथें
शूलासम कानीं सले उग्र संगीत !

आक्रंदत काळिज विदीर्ण वक्षाखालीं
फुटलेल्या पणतिंत जळे कोरडी ज्योत.

ओंठावर होती मुकी समाधी एक
पोटांत जिच्या विच्छिन्न मनाचें प्रेत !

बेहोष घोष तो ऐकुनिया चक्रांचा
क्षण मनास आली मादकता विक्रान्त.

हिमगिरीप्रमाणें विरघळलें जग भंवतीं
अन् जागी झाली माणुसकी हृदयांत !

क्षणिं दुभंग झाल्या हृदयांतील समाधी
पांगळीं पिशाच्चें उठलीं नाचत गात !

वर पुन्हां पहातां उरीं कसेंसें होई
डोळ्यांचे खन्दक—जमे निखारा त्यांत !

आकुंचित होई आवेगांत ललाट
थरथरुनि किंचित हल्ला उजवा हात !

पाहिलें सभोंतीं फोडुनि अन् किंकाळी
चक्रांत घातलें मनगट आवेशांत !

कक्षेंत रवीच्या तुटून ये ग्रहखण्ड
ओढला जाउनी तसा फिरे चक्रांत

तनु दुभंग झाली आणि थांबलें चाक
घंटाध्वनि घुमला गंभीर अवकाशांत !

पुणें १९३८

## सहानुभूति

(जाति : दिंडी)

उभे भंवती प्रासाद गगनभेदी
पथीं लोकांची होय दाट गर्दी
प्रभा दीपांची फुले अन्तराळीं
दौलतीची नित चालते दिवाळी !

कोपऱ्यासी गुणगुणत अन् अभंग
उभा केव्हांचा एक तो अपंग
भोंवतींचा अंधार जो निमाला
हृदयिं त्याच्या जणु जात आश्रयाला !

जीभ झालेली ओरडून शोष
चार दिवसांचा त्यांतही उपास
नयन थिजले थरथरति हातपाय
रूप दैन्याचें उभें मूर्त काय ?

कींव यावी पण तयाची कुणाला
जात उपहासुनि पसरल्या कराला
तोंच येई कुणि परतुनी मजूर
बघुनि दीना त्या उधाणून ऊर
म्हणे, राहीन दिन एक मी उपाशीं
परी लाभूं दे दोन घांस यासी.
खिसा ओतुनि त्या भुक्या ओंजळींत
चालुं लागे तो दीनबंधु वाट !
—आणि धनिकांचीं वाहनें पथांत
जात होतीं तीं आपुल्या मदांत !

## सात

( जाति : द्राक्षकन्या )

[ शिवाजीचा सेनापति प्रतापराव गुजर याचा एके ठिकाणीं पराभव होऊन तो पळाला. शिवाजीला ही वार्ता समजतांच रागाच्या भरांत त्यानें सेनापतीला एक निर्भत्सनात्मक पत्र लिहिलें. तें वाचून आलेल्या उद्–वेगाच्या आवेशांत प्रतापरावानें सात सरदारांसह थेट शत्रूच्या छावणींत प्रवेश केला. या वेड्या प्रयत्नामध्यें ते सातही वीर प्राणास मुकले. कवितेची सुरवात शिवाजीच्या पत्रापासून आहे. ]

वेडांत मराठे वीर दौडले सात !
“ श्रुति धन्य जाहल्या श्रवुनि आपुली वार्ता
रण सोडुनि सेनासागर अमुचे पळतां
अबलाहि घरोघर खऱ्या लाजतिल आतां !
भर दिवसा आम्हां दिसूं लागली रात ”
वेडांत मराठे वीर दौडले सात !

तें कठोर अक्षर एक एक त्यांतील
जाळीत चाललें कणखर ताठर दील
“ माघारीं वळणें नाहिं मराठी शील
विसरला महाशय काय लावितां जात ? ”
वेडांत मराठे वीर दौडले सात !

वर भिवई चढली दांत दाबती ओठ
छातीवर तुटली पटबंदाची गांठ
डोळ्यांत उठे काहूर ओलवे कांठ
म्यानांतुन उसळे तरवारीची पात
वेडांत मराठे वीर दौडले सात !

" जरि काल दाविली प्रभु, गनिमांना पाठ
जरि काल विसरलों जरा मराठी जात
हा अ.ा धांवतों आज अरी-शिबिरांत
तव मानकरी हा घेउनि शीर करांत "
वेडांत मराठे वीर दौडले सात !
ते फिरतां बाजुस डोळे किंचित ओले
सरदार सहा सरसावुनि उठले शेले
रिकिबींत टाकले पाय, झेलले भाले
ढग जात धुळीचे दूर क्षणीं क्षितिजांत
वेडांत मराठे वीर दौडले सात !
आश्चर्यमुग्ध टाकून मागुती सेना
अपमान बुजविण्या सात अर्पुनी माना
छावणींत शिरले थेट, भेट गनिमांना
कोसळल्या उल्का जळत सात दर्यांत
वेडांत मराठे वीर दौडले सात !
खालून आग, वर आग आग बाजूंनीं,
समशेर उसळली सहस्र क्रूर, इमानी,
गर्दीत लोपले सात जीव ते मानी
खग सात जळाले अभिमानी वणव्यांत
वेडांत मराठे वीर दौडले सात !
दगडांवर दिसतिल अजुनि तेथल्या टांचा
ओढ्यांत तरंगे अजुनि रंग रक्ताचा
क्षितिजावर उठतो अजुनि मेघ मातीचा
अद्याप विराणी कुणि वाऱ्यावर गात
वेडांत मराठे वीर दौडले सात !

नाशिक १९३६

## माळाचें मनोगत

( छन्द : परिलीना )

कोठें हो जीवन ? जीव हो आर्त !
आग ही असह्य बाहेर आंत !
    कोठें ना सहानुभूति
    कोठें ना स्नेह ना प्रीति
कोठेंहि संगत सोबत नसे
एकान्त काळिज पिंजत वसे !

वाहतो नेहमीं उनाड वारा
व्यापवी धुळीनें प्रदेश सारा
    ओततो रवि तो आग
    कठोर रात्रीचा राग
कठोर कधीं त्या पाऊसधारा
    कापीत कापीत जातात उरा !

वाटतें बुल्बुल कोयळ यावे
मंजुळ संगीत तयांनीं गावें
    जीवन—जाणीव सारी
    विरावी घटकाभरी
येऊन कधीं तें घुबड मात्र
भीषण भासवी अधिक रात्र !

वसंत येतांच उल्हास वाटे
फुलेल वेल का एखादी कोठें

मराठी ग्रंथ संग्रहालय
१०५८५

पाहीन फुलांच्या हारी
वेडीच आशा ही परी
येतात जातात वसंत किती
राहते भूमि ही तशीच रिती !

आहे का खरेंच नंदनवन
फुलांचें रान अन् खगांचें गान
निर्मळ जलाचा झरा
सुगंधी शीतल वारा
शल्य हें अधिक वा खुपण्याला
केलेली कोणी ही कल्पना–लीला ?

कोठें ना जिवास मायेची ओढ
नाहीं वा मुळींहि ध्येयाची जोड
सार्थता जीविता नाहीं
भकास दिशा या दाही
कशास आयुष्य देवा, इतुकें
शतकामागून जातीं शतकें

नाशिक १९३५

## ऋण—

( वृत्त : पृथ्वी )

पदीं जळत वालुका वर उधाणलेली हवा
जळास्तव सभोंवतीं पळतसे मृगांचा थवा
पथीं विकलता यदा श्रमुनि येतसे पावलां
तुम्हीच कवि हो, दिला मधुरसा विसावा मला !

अहो उफळला असे भंवति हा महासागर
धुमाळुनि मदान्ध या उसळतात लाटा वर,
अशा अदय वादळीं गवसतां किती तारवें
प्रकाश तुमचा पुढें बघुनि हर्षति नाखवे !

असाल जळलां तुम्ही उजळ ज्योति या लावतां
असाल कढलां असे, प्रखर ताप हा साहतां;
उरांत जखमांतली रुधिर–वाहिनी रोधुनि
असेल तुम्हि ओतलीं स्वर–घटांत संजीवनी !

नकोत नसलीं जरी प्रकट स्मारकांचीं दळें
असंख्य हृदयीं उभीं असत आपुलीं देवळें !

नाशिक १९३६

## उमर खैयाम

( शार्दूल-विक्रीडित )

पुष्पांची पसरीत रास अपुल्या पाऊलवाटेवरी
सह्याद्रीमधल्या दऱ्या कवण हा पांथस्थ हो आक्रमी !
न्यारी वेष-तऱ्हा, झगा झुळझुळे पायावरी रेशमी
मुद्रा शांत उदास, केश रुळती किंचित् हिमानी शिरीं.

सोन्याची सुरई करांत, उसळे त्यांतूनिया वारुणी
फेसांतील छटा पहा, वितळलीं रत्नें जणूं आरुणी !
आहे वृद्ध कवी परी सहचरी रंगेल ये संगतीं
वस्त्रांतून जिच्या फुलें नवतिची उन्मादशाली रती !

देखा, चाहुल लागतां फुलतसे वाटेंतला ताटवा
त्यासी बाहुनि जादुगार जगता संदेश सांगे नवा—
वृक्षाखालिल सावलींत सखिच्या संगे सुराप्राशन
गाणें गात रसाळसें मग मरूभूमीवरी नंदन !

केला कुंभ कुणी कुठें वसतसे कुंभार तो हुन्नरी ?
राहे तो मशिदींत वा रमतसे या उंचशा मंदिरीं !
आहे निर्गुण का ? कशास श्रमसी या अक्षरांच्या रणीं !
आमंत्री पसरून बाहु इकडे ही 'द्राक्षकन्या' गुणी !

नाशिक १९३४

## विजयोन्माद

मी जिंकलों ! मी जिंकलों !
ओतीत या विष सर्प हो
जहरी भरा जगिं दर्प हो
  गिळण्या हलाहल शंकरा—
परि शक्त मी आजिं जाहलों
मी जिंकलों ! मी जिंकलों !

शरवृष्टि वक्षीं होउं द्या
उल्का नभांतुन वर्षु द्या
  दावानलीं दडुं द्या दिशा
निःशंक त्यांतुन चाललों
मी जिंकलों ! मी जिंकलों !

कर वादळा, वर तांडव
शिरिं घाल विद्युत–मांडव
उरिं शैल वा, सायुज्यता —
वज्रामधें मी पावलों
मी जिंकलों ! मी जिंकलों !

तेजार्णवीं नव पोहलों
आकाश व्यापुनि राहिलों
  आतां तमा कसली तरी
संजीवनीमधिं नाहलों
  मी जिंकलों ! मी जिंकलों !

नाशिक १९३६

## शेवटचें पान

(जाति : कोकिळा)

आवर पद हे मत्त प्रवासी,—
पहा जरा परतून प्रवासी, पहा जरा परतून्

घेत सुगंधाचा मागोसा
अलीपरी आलास विलासा
आणि फुलोरा लुटून जासी नव वेलीवरतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

कलेकलेनें चान्द खरोनी
आवस आली माझ्या गगनीं
तोंच उदेले दोन सुधाकर सुन्दर नयनांतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

आणि चान्दणें सवें घेउनी
दुणावुनी तम जासी निघुनी
कशी साहुं रे धुन्द रात ही बाहेरुन आंतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

क्षणभर येउन क्षणभर राहुन
क्षणभर हांसुन क्षणभर पाहुन
क्षणांत जासी चार युगांचा घाव उरीं घालून्
प्रवासी, पहा जरा परतून्

वाळवण्टि तूं एक पदाती
ना कुणि सोबत ना साङ्गाती
पायतळीं पेटेल आग उद्दाम शिरावर ऊन्
प्रवासी, पहा जरा परतून्

परत पाखरा, खन्त कशाला
घालित तनुची तुला दुशाला
उन्नत माझें ऊर उशाला घोष तुझा ज्यांतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

जाणारच का—सुखांत जा तर
बाग मोहरो तव वाटेवर
माग घेत तव चंद्र पुनेचा येवो गगनांतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

शेवटलें जा पान मिटूं दे
सुखेनैव यापुढें तुटूं दे—
हृदयाचें रेशीम पदीं तव बसलेलें गुंतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

पुणें १९३८

## शेवटचें पान

(जाति : कोकिळा)

आवर पद हे मत्त प्रवासी,—
पहा जरा परतून प्रवासी, पहा जरा परतून्

घेत सुगंधाचा मागोसा
अलीपरी आलास विलासा
आणि फुलोरा लुटून जासी नव वेलीवरतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

कलेकलेनें चान्द खरोनी
आवस आली माझ्या गगनीं
तोंच उदेले दोन सुधाकर सुन्दर नयनांतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

आणि चान्दणें सवें घेउनी
दुणावुनी तम जासी निघुनी
कशी साहुं रे धुन्द रात ही बाहेरुन आंतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

क्षणभर येउन क्षणभर राहुन
क्षणभर हांसुन क्षणभर पाहुन
क्षणांत जासी चार युगांचा घाव उरीं घालून्
प्रवासी, पहा जरा परतून्

वाळवण्टि तूं एक पदाती
ना कुणि सोबत ना साङ्गाती
पायतळीं पेटेल आग उद्दाम शिरावर ऊन्
प्रवासी, पहा जरा परतून्

परत पाखरा, खन्त कशाला
घालित तनुची तुला दुशाला
उन्नत माझें ऊर उशाला घोष तुझा ज्यांतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

जाणारच का—सुखांत जा तर
बाग मोहरो तव वाटेवर
माग घेत तव चंद्र पुनेचा येवो गगनांतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

शेवटलें जा पान मिटूं दे
सुखेनैव यापुढें तुटूं दे—
हृदयाचें रेशीम पदीं तव बसलेलें गुंतून्
प्रवासी, पहा जरा परतून्

पुणें १९३८

## उषःकाल

(जाति : माधवकरणी)

झाला उषःकाल राणी !

हिमबिंदू बिलगुनी फुलांना पानांना बसती
हलती हळु वाऱ्यावरती
जोजवती जणुं नवथर बाला हीं बाळें चिमणीं
झाला उषःकाल राणी !

निळवन्तीच्या फुलूं लागल्या कळ्या कुंपणावरी
येउनि रात्रीच्या प्रहरीं
परत जायचें विसरुनि गेल्या वनदेवी कोणी
झाला उषःकाल राणी !

माणिकमोत्यांची पायाशीं घालुनि बरसात
बसे संन्यस्त पारिजात
वाहुं लागला सुगंध वारा तो वातावरणीं
झाला उषःकाल राणी !

वनराईंतुनि उठूं लागलीं करीत किलबिल तीं
पाखरें, अन् गगनीं जातीं
सोन्याच्या दर्यांत गल्बतें जणुं गोजिरवाणीं
झाला उषःकाल राणी !

इन्द्रनील ओटींत घेउनी शिंपित भंवतालीं
आली निर्झरिणी, आली

खळाळतें खडकावर हंसापरी शुभ्र पाणी
    झाला उष:काल राणी !

किनारती कनकाच्या धारा उदयगिरी वरती
    जगावर अभिनव ये कांती
समूर्त झाली महाकवींची काय दिव्य वाणी
    झाला उष:काल राणी !

स्वप्नांचा वा खजिना घेऊनि लगबगिनें रात्र
    गेली, चुकोनिया मात्र
उषास्वप्न हें उरलें मागें—तुजसाठीं रमणी
    झाला उष:काल राणी !

नाशिक १९३७

## तूं उंच गडीं राहसि— ( गझल : भिल्लीण )

तूं उंच गडीं राहसि गे राजकुमारी,
रानांत फिरे गाळित मी घाम दुपारीं !
प्रीतीस तुझ्या पात्र न हा दीन दरिद्री
शब्दास्तव सम्राट तुझ्या तिष्ठति दारीं !
आकाशिं भिडे ती तव गर्वाढ्य हवेली
कङ्गाल कुटी केवळ ही दौलत सारी !
सुग्रास तुझें भोजन पात्रांत रुपेरी
कष्टार्जित थाळींत इथें मात्र जवारी !
विश्रान्ति तुला मंचकिं देतात दुशाला
बाहूच उशाला मज भूमीच पथारी !
वाळूराणिं ओढीत असे जीवन–रिक्षा
पुष्पाकुल भूमींत तुझा मार्ग किशोरी !
काव्यांतिल कोमेजुन जाईल फुलोरा
अन् कण्टक येतील करीं मात्र विखारी !
स्वप्नांसह जाईल सखे, रात्र सरोनी
येतां रवि माथ्यावर संपेल उभारी !
तूं हंस निवासास तुझ्या योग्य हिमाद्री
साहेल कसें जीवित या रुक्ष पठारीं !

नाशिक १९३३

## प्रीतीविण

(गझल : भिल्लीण)

प्रीतीविण प्रासाद गमे शून्य जिवाला
येईल चितेचीच कळा इंद्रमहाला !

प्रीतीविण पुष्पांतिल लोपेल सुगंध
प्रीतीविण ज्योत्स्नेंत पहा दाहक ज्वाला !

प्रीतीस नको तख्त नको ताजमहाल
प्रीतीस हवी प्रीति, वृथा खन्त कशाला ?

प्रीतींत फुलें जीवन, प्रीतींत सुखाशा,
प्रीतीविण दावानल, ग्रासेल भवाला !

प्रीतीसह मागावर येईल वसन्त
प्रीतीविण अन् जीवन शोषेल उन्हाळा !

वक्षावर विश्रान्त तुझ्या होईल माथा
बाहूंत तुझ्या रक्षक लाभेल दुशाला !

हातांत सख्या, घालुनिया हात प्रवासी
ये संगति, प्रीतीवर ठेवून हवाला !

## नदीकिनारीं

( जाति : चंद्रकांत )

नदीकिनारीं लवून पिंपळ बघतो पाण्यांत
अन् पर्णांची जलराणीवर उधळी बरसात !

लतालतांवर खोलुनि बसलीं फुलें अन्तरङ्ग
लुटण्या ते मधुकोश रुंजती भंवताली भृंग !

कडेकपारीवरुनी दौडत निर्झर हा आला
कुजबुज कांहीं करी नदीच्या बिलगे हृदयाला.

आकाशांतुन घनश्याम आळवतीं धरणीला
आणि सखीच्या गळां घालती मोत्याची माला !

कणाकणांतून घ्या कानोसा अवघ्या सृष्टींत
ऐकूं येईल सुखमय मंगल प्रेमाचें गीत !

ग्रहताऱ्यांचें रासनृत्य हो गगनीं दिनरात
पक्षापरि सृष्टीच दडे प्रेमाच्या घरट्यांत !

विसरुनि वैकुंठांतिल यास्तव आसन श्रीमन्त
हृदयाहृदयांमधून राहूं लागे भगवन्त !

नाशिक १९३५

## पाचोळा

(जाति : दिंडी)

आडवाटेला दूर एक माळ
तरू त्यावरती एकला विशाळ
आणि त्याच्या विलगोनिया पदास
जीर्ण पाचोळा पडे तो उदास

उषा येवो शिंपीत जीवनासी
निशा काळोखीं दडवुं द्या जगासी
सूर्य गगनांतुनि ओतुं द्या निखारा
मूक सारे हें साहतो बिचारा !

तरूवरचीं हंसतात त्यास पानें
हंसे मुठभर तें गवतही मजेनें
वाटसरु वा तुडवीत त्यास जात
परी पाचोळा दिसे नित्य शान्त !

आणि अंतीं दिन एक त्या वनांत
येइ धांवत चौफेर क्षुब्ध वात
दिसे पाचोळा, घेरुनी तयातें
नेइ उडवुनि त्या दूर दूर कोठें !

आणि जागा हो मोकळी तळाशीं
पुन्हा पडण्या वरतून पर्णराशी !

नाशिक १९३४

## बंदी

(जाति : दिंडी)

तोरणाच्या रमणीय चौकटीला
धरुनि राघू पंजरीं ठेविलेला
पडे पुढती फळ रत्न-पुंज लाल
आर्त डोळे पण धुंडतात नील !

तोंच नीलांतुनि कुणी जातभाई
पिंजऱ्यांशीं झांपून हळू येई
भाव डोळ्यांतुन दाटले भरारा !
आणि कैदी विसरून जाय कारा !

चोंच लावुनि चोंचीस क्षण बसावें
नयन नयनाला क्षणभरीं मिळावे
भावनिर्भर कुजबूज करुनि कांहीं
अन्तरींची ते दाविती व्यथाही

मालकाची चाहूल तोंच लागे
जातभाई उडुनिया जात वेगें
आणि बंदी-खग क्षुब्ध होत भारी
मारि धडका धडधडा बंद दारीं !

शान्त झाला अन् शेवटीं शिणोनी
जाय भरुनी पण पिंजरा पिसांनीं !

नाशिक १९३३

## आव्हान

( जाति : भूपालि )

बलवन्ता, आव्हान्
बळीचें बलवन्ता, आव्हान्
असेंच चालूं दे चहुंकडुनी अखण्ड शरसंधान् !

रक्तानें न्हाली
तनू ही रक्तानें न्हाली
आणि चाळणी जरी छातिची पिंजुनिया झाली—

काळजांत उठती
कळा जरि काळजांत उठती
बळी गिळाया घारगिधाडें घोटाळत वरती !

लवहि न आशंका
परन्तू लवहि न आशंका
समर पुकारित राहिल नित हा रणशाली डंका !

बुरुजावरति निशाण्
उभें हें बुरुजावरति निशाण्
किरीट उज्ज्वल चढो शिरावर वा होवो शिरकाण् !

पुणें १९३८

## बायरन्

( सुनीत : शार्दूलविक्रीडित )

वेगें आदळती प्रमत्त गिरिशा लाटा किनाऱ्यावरी
पाषाणीं फुटती पिसूनि कणिका लक्षावधी अम्बरीं
आणी झिंगुनि धावती पुनरपी झुंजावया मागुनी
भासे वादळ भव्य उग्र असलें त्या गर्व–गीतांतुनी !

अभ्रांच्या शकलांमधून तळपे, भासे जसा भास्कर
शब्दांआडुनही त्वदंतर दिसे उन्मत्त अन् चंचल !
केव्हां बद्ध सुपर्ण पंख उधळी तोडावया अर्गल
केव्हां नाजुक पाकळ्यांत अडके बागेंतला तस्कर !

काळाच्या कवि, वालुकेवरि तुवां जीं रोवलीं पावलें
नाहीं दर्शविण्यास शक्य पथ तीं–आणि नसो तीं तरी
आहे आग जगांतली जरि नसे संगीत स्वर्गांतलें
तत्त्वांचा बडिवार नाहिं अथवा ना गूढशी माधुरी.

जेथें स्थण्डिल मानसीं धगधगे विच्छिन्न मूर्तीपुढें
तेथें शिंपिल शारदा तव परी शीतोदकाचे सडे !

नाशिक १९३६

## प्रतीक्षा

( जाति : केशवकरणी )

तीर मारला तुम्हिच नेमका मुक्त पांखरावरी
जात तें असतांना अंबरीं

हतबल होउन आणि बापडें पडतां पायावरी
निष्ठुरा, कसें जाहलां दुरी ?

दूर जाहलां कसें म्हणूं पण असतां मूर्ती तरी
सदा या हृदयाच्या मंदिरीं

कुठें जिवलगा, शिकलां असली कठोर जादूगिरी
जुलुम कां असला अबलेवरी !

ओतून चंद्रिका आग लावली अशी
शेजेंत भिजे ही अश्रूंनीं मम उशी
कर गळ्यांत घालुन मान कापली कशी !
मळा पेरुनी फुलाफळांचा बहर यायचा परी
परंतू गेला शेतकरी !

वसन्त ऋतुनें आम्रावरची बहरुनि ये मंजरी
उडाला कोकिल कोठें तरी !

किती सारुनी दूर झालरी टक लावूं दुरवरी
प्रियकरा, शून्य क्षितिजावरी

रोज उगवती चंद्रसूर्य ते परि माझ्या अन्तरीं
नेहमीं काळोखाची दरी

मी सुखांत असतां मऊ परांच्यावरी
या संगमरवरी शीतल सौधांतरीं
कां चूड फेकली सर्व वैभवावरी

विझवाया हा वणवा राया, येशिल का लौकरी ?
ना तरी उतरिन मी पायरी !

नाशिक १९३३

## आश्वासन

(जाति : द्राक्षकन्या)

भांडार प्रीतिचें भरलें; कां धनचिंता,
दशदिशा चांदणें, कां पणतीस्तव झुरतां,
आकाश-पथांतुनि नक्षत्रापरि फिरतां
घरट्याचा केंवा कशास प्रणय-भ्रांता !

डोहावर देउळ चिराचिरा खळलेला,
पायावर वरतुन पाचोळा पडलेला,
तो कळस कोसळुन अर्घ्यावर अडलेला,
मूर्तीला बिलगे तरी कुणाची माला !

तूं ऐस गडीं वा पडशाळेच्या कोनीं,
तूं नीज परांवर वा पर्णावर रानीं,
फुलरास फुलो वा फुलो निखारा चरणीं,
तूं राजा आणिक तुझी प्रिया, मी राणी !

## प्रकाश-प्रभु

( जाति : अंजनी )

घट तेजाचे भंवती ओतित
असंख्य रवि-राजाचे प्रेषित
महाद्वार पूर्वेचें खोलुन क्षितिजांवर येती !

चराचरांचें घेउन जीवन
करांत, उदयाद्रीवर मागुन
टाकित पद गंभीर येतसे परमेश्वरमूर्ती.

आणि प्रभूचें आरुण, मंगल
पडतां क्षितिजावरती पाउल
अग्निरसाच्या उठूं लागल्या लाटा भूवरती.

देवाचा कर जातां स्पर्शुन
मेघखंडही दुभंग होउन
ज्योती उज्ज्वल निघुनी आंतुन गगना आक्रमती

करण्या सम्राटांचें स्वागत
नटलेली भू, नटले पर्वत
फुलांतही शृंगारुन बसली नाजुक हिमवंती.

या माझ्या हृदयावर देवा,
पवित्र अपुलें पाउल ठेवा
अद्यापी अंधार रात्रिचा रेंगाळत अंतीं

राहिल चरणांची हृदयीं खुण
उरतिल अंतरिं तेजाचे कण
रात्रीमागुन रात्र येउं द्या कसलीं मग खंती ?

## मेघास

थांब थांब परतुं नको रे घना कृपाळा,
अजुनि जाळतोच जगा तीव्र हा उन्हाळा !

अजुनि पायिं भासतात पसरले निखारे
उसळतात अजुनि गगनिं पेटलेच वारे
मरुनि पडत तरुवरुनी पांखरें तळाला !

तगमगुनी टाकितसे भूमि ही उसासे
शून्यहृदय होत नदी हंसत विकट भासे
रखरखती दाहि दिशा उफळतात ज्वाळा !

हतभागी दिसत तरू जाळल्या उन्हानें
पायाशीं पडलेलीं गळुनि दग्ध पानें
आशा जणुं पिचलेल्या लगटती जिवाला !

बांधावर बसुनि नजर बांधुनि आकाशीं
तडफडती गाइगुरें पाहुनी उपाशीं
शेतकरी बैसे कर लावुनी कपाळा !

गर्जत ये, ओढित ये आसुड तडितेचा
गर्वोन्नत माथा तो नमव भास्कराचा
लोकाग्रणि नमवि जसा मातल्या नृपाळा !

नाशिक १९३३

## प्रकाश-प्रभु

( जाति : अंजनी )

घट तेजाचे भंवती ओतित
असंख्य रवि-राजाचे प्रेषित
महाद्वार पूर्वेचें खोलुन क्षितिजावर येती !

चराचरांचें घेउन जीवन
करांत, उदयाद्रीवर मागुन
टाकित पद गंभीर येतसे परमेश्वरमूर्ती.

आणि प्रभूचें आरुण, मंगल
पडतां क्षितिजावरती पाउल
अग्निरसाच्या उठूं लागल्या लाटा भूवरती.

देवाचा कर जातां स्पर्शुन
मेघखंडही दुभंग होउन
ज्योती उज्ज्वल निघुनी आंतुन गगना आक्रमती

करण्या सम्राटांचें स्वागत
नटलेली भू, नटले पर्वत
फुलांतही शृंगारुन बसली नाजुक हिमवंती,

या माझ्या हृदयावर देवा,
पवित्र अपुलें पाउल ठेवा
अद्यापी अंधार रात्रिचा रेंगाळत अंतीं.

राहिल चरणांची हृदयीं खुण
उरतिल अंतरिं तेजाचे कण
रात्रीमागुन रात्र येउं द्या कसलीं मग खंती ?

## मेघास

थांब थांब परतुं नको रे घना कृपाळा,
अजुनि जाळतोच जगा तीव्र हा उन्हाळा !

अजुनि पायिं भासतात पसरले निखारे
उसळतात अजुनि गगनिं पेटलेच वारे
मरुनि पडत तरुवरुनी पांखरें तळाला !

तगमगुनी टाकितसे भूमि ही उसासे
शून्यहृदय होत नदी हंसत विकट भासे
रखरखती दाहि दिशा उफळतात ज्वाळा !

हतभागी दिसत तरू जाळत्या उन्हानें
पायाशीं पडलेलीं गळुनि दग्ध पानें
आशा जणुं पिचलेल्या लगटती जिवाला !

बांधावर बसुनि नजर बांधुनि आकाशीं
तडफडती गाइगुरें पाहुनी उपाशीं
शेतकरी बैसे कर लावुनी कपाळा !

गर्जत ये, ओढित ये आसुड तडितेचा
गर्वोन्नत माथा तो नमव भास्कराचा
लोकाग्रणि नमवि जसा मातल्या नृपाळा !

नाशिक १९३२

## भाव–कणिका

तूं गगन-महालीं वससी वैभवशाली
मी पायपथाच्या धुळींत खपतों खालीं
गुदमरुन उभा मी अथांग या गर्दीत
या कोलाहलिं तुज आळवतों मधु गानीं
स्वर-लहरि कधीं त्या रिघतिल का तव कानीं ?

हें हृदय नसे परि स्थंडिल धगधगलेलें
आशांचें इंधन अखंड त्यावर चाले
हें जीवन कीं हें मृगजळ एक विराट
मृग आर्त धांवती दूर, सारखें दूर
अन् क्षितिजावरती सदा जलाचा पूर !

रे परत पांखरा, परत जायचें आज
ये अस्तगिरीवर क्षणाक्षणानें सांज
रवि सुवर्ण-तारूसम लोपेल समुद्रीं
पसरील पंख काळोख निळ्या आकाशीं
ये गाऊं तोंवर, बैस जरा मजपाशीं !

एकाग्र मनानें पूजित होतों मूर्ति
मिटलेल्या डोळां दिसे दिव्यशी दीप्ति

कां जागृत केलें करुनी भग्न समाधी
अन् ऐकविलें तें सत्य कठोर विधान
“ रे देव नसे हा, असे मात्र पाषाण ! ”

रेखलें मनोहर हें रमणीचें चित्र
कमलापरि फुललें दिसे गात्र नी गात्र
उत्फुल्ल स्तन ते, कुंभ जणूं कनकाचे
जडविलीं जयावर आणि माणकें लाल,
परि हृदय त्यांतलें कधीं काय रेखाल ?

ही वाट वनांतुन गर्द भरे अंधार
मावळे विधूची कधींच बारिक कोर
हा घुमे पिशाचापरी तरुंतुनि वारा
चमकती दूरवर तुझ्या घरांतिल ज्योति
पद पुढें ढकलतों विसंबून त्यांवरती !

## ध्यास

(अभंग)

चांदण्याचा स्रोत झरे नभांतून
माझ्या मनांतून ध्यास तुझा.

निर्झराचा नाद घुमे पहाडांत
माझ्या अन्तरांत हांक तुला.

जुन्या देवळांत उजळते वात
माझ्या जीवनांत प्रीति तुझी.

निळ्या आभाळांत पाखरांचे थवे
वेडी माया धावे तुझ्याकडे.

निशीं स्मशानांत रात्रिंचर रडे
उरीं धडधडे तुझ्यासाठीं.

नाशिक १९३२

## निर्माल्य (सुनीत)

होता मोहरला वसन्त वितरी मार्गावरी तो फुलें
होते धुन्द सुवास ते चहुंकडे विश्वामधें दाटले,
स्वप्नांच्या कमळीं अळीपरि दडे रात्रीं सुखें अन्तर
आणी पंख उभारवून दिवसा झापूं बघे अम्बर !

येशी दृष्टिपथांत तूं, जणुं उभी प्राचीवरी हो उषा
झाला आरुण जीवनौघ, भरला आल्हाद दाही दिशा !
मूर्ती मोहक गौर, गोल मुख अन् किंचित् निळ्या लोचनीं
वाहे मन्थर आणि जीवनमयी ती भावमन्दाकिनी !

साधी वेषतऱ्हा तयांतहि खुले ती आकृती लालस
डोळ्यांतूनच भावबन्ध जडले–प्रीती असे डोळस !
जाण्याला निघसी अचानक पुढें, व्याकूळसी पाहुनी,
गंगा लोपुनि गर्जना करित तो सिंधूच नेत्रांतुनी !

आणि गेलिस तूं–वसन्तहि सखे गेला तुझ्या संगतीं,
पुष्पांतील उडून गंध उरलें निर्माल्य हें भोंवतीं !

नाशिक १९३२

## जीवन-लहरी

( जाति : जीवनलहरी )

रात्र अशी अन्धेरी
तेवत ना दीप कुठें
चुकलेली चाकोरी
अन्थरले पथिं कांटे
तूंच इथें पाठविलें
तूंच दिवे मालविले
पंकीं पद पडतां मग
बघशी कां रागानें ?

आशा रात्रीं रचते
वैभवशाली नगरी
अनुभव परि तुडवित ती
येतो दिवसा दारीं
करुनीया विकट हंसें
आशेला आणि पुसे
वेड्यापरि बसशी कां
रात्रीची जागत तूं ?

मातीचा इमला हा
कणकण हळु ढांसळतो

अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........


अविरत नद काळाचा
भंवतालीं फेंसळतो
लाटा उठती, फुटती
भिंती पडती, बुडती
अन्तीं अवशेष नुरे
हीच असे का नियती !

## पावनखिंडींत

( जाति : शामाराणी )

सरणार कधीं रण प्रभू तरी
हे कुठवर साहूं घाव शिरीं ?

दिसूं लागले अभ्र सभोंती
विदीर्ण झाली जरि ही छाती
अजून जळते आंतर ज्योती
कसा सांवरूं देह परी ?
सरणार कधीं रण प्रभू तरी !

होय तनूची केवळ चाळण
प्राण उडाया बघती त्यांतुन
मिटण्या झाले अधीर लोचन
खड्ग गळालें भूमिवरी
सरणार कधीं रण प्रभू तरी !

पावन-खिंडिंत पाउल रोवुन
शरीर पिंजे तों केलें रण
शरणागतिचा अखेर ये क्षण
बोलवशिल का अतां घरीं ?
सरणार कधीं रण प्रभू तरी !

नाशिक १९३२

## सैगल

( जाति : चन्द्रकला )

भर मार्गात कधीं ऐकतां तव मंजुळ गान
अडखळुनी जागीं थांबतों क्षणभर बेभान !
शब्दाशब्दाच्या घटांतुन ओसंडे भाव
पारिजातकाच्या फुलांचा कोमल वर्षाव !

मंद लयींमधली आर्तता अन् मोहक झार
तप्त कांचनाची जणूं तूं खेचतोस तार !
प्रशान्त ओहळतें स्वरांतिल सुंदर मार्दव हें
गहन भावनांची गमे ही जान्हवीच वाहे !

घालविल्या रात्री आठवे, त्या गोदाकांठीं
घाटावर माथें टेकतां विश्रांतीसाठीं,
काळोखांतुनि ये दुरोनी दिव्य तुझा नाद
जीर्ण देवळांच्या तटावर घुमवित पडसाद !

हृदयांतील रणें जाहलीं क्षणामधें शान्त
आणि विस्मृतीच्या नाहली चांदण्यांत रात !
अशींच संगीतें आळवीं तुझीं कलावन्ता,
घडिभर जागव रे आमुची अशीच मानवता !

मुंबई १९४०

**कुतूहल** ( जाति : चंद्रकांत )

लवले होते फुलुनि ताटवे नव्या वसन्तांत,
चंद्र बिलोरी शिंपित होता रजतानें रात;
बसलों होतों हिरवळींत गुणगुणत भावगीत;
आशा पक्ष्यांपरी उडाल्या होत्या गगनांत;

तोंच अचानक फुलें कोठुनी पडलीं ओंजळभर,
आणि खोडकर तुझे हात ते आले खांद्यावर !
कलेकलेनें चंद्रापरि तें प्रेमहि मावळलें,
शीड फिरवुनी तारूं आपुलें माघारीं वळलें;

आज पुन्हां त्या जागीं येतां तुटलेले धागे
ताटव्यांत या दिसती अजुनी, हो अंतर जागें;
आज नसे ती व्याकुलता, ना राग, न अनुराग,
विझून गेली कधींच, जी तूं फुलविलीस आग;

मात्र कुतूहल केवळ वाटे वळतांना पाउलें,
किती जणांवर उधळलीस वा उधळशील तूं फुलें ?

नाशिक १९३८

## अससि कुठें तूं—

अससि कुठें तूं ? ढगांत दडती मिनार ज्याचें निळे
सुवर्णदीपामधें स्नेहमय वात जिथें पाजळे
त्यागुनि शेषासना विहरते श्रीदेवी ज्या स्थळीं
पायघड्यास्तव जिथें शिंपती मोत्यांच्या ओंजळी

जिथें परांच्या शय्येवरती विलासतें यौवन
अधिकाराचें जिथें विराजे सुखकर सिंहासन
अससि काय तूं त्या प्रासादीं, विभवाच्या संगतीं
भग्न उसासे पण तेथुनही वाऱ्यावर वाहती !

अससि कुठें तूं ? रूप सृष्टिचें प्रकट जिथें जाहलें
जिथें चराचर मंगलतेनें शुचितेनें नाहलें
नितळ शीत जळ संथ गतीनें नदीमधें झुळझुळे
हार सृष्टिचा निखळुनि मोती एकएक कीं गळे

दाट आमराईंत विसावा वितरितसे सांवली
मोट उपसते विशुद्ध जीवन-गंगा विहिरींतली
वससि काय तूं झोंपडींत त्या किसानगोपांसवें
तिथेंहि पडतीं धुळीमधें पण जळजळतीं आसवें !

अससि कुठें तूं ? जिथें प्रभूची मूर्ति उभी मन्दिरीं
रसाळ गीतें भक्तजनाचीं दुमदुमतीं अम्बरीं
सुगन्धमय धूपांचा परिमळ वातावरणीं भरे
मृदंग झांजांतुनी झिरपती भक्तिसुधेचे झरे

मायापाश जियें तुटलेले, जिवाशिवाची मिठी
विरक्तता जेथून पाहते पैलजगाच्या तटीं —
असस‍ि काय तूं मन्दिरांत त्या भक्तमंडळासह
वैफल्याची तिथेंहि जळते चिता कधीं दुःसह !

असस‍ि कुठें तूं—अखण्ड मानवयात्रा तुज शोधते
अथवा अससी मृगजल, परि जें प्रगतिपथीं ओढतें !

## भक्तिभाव

क्षण एक तरी तूं येशिल का ?
चरणाच्या स्पर्शे तव मंगल
  पावन घर मम करशिल का ?

  मिरवणूक ये वाजत गाजत
  नृपापरी तूं तींत विराजत
  दुमदुमती जयनाद तुझे नित
वैभव तें विसरून घडीभर
स्वागत हें मम घेशिल का ?

  जीवनसुम तुजसाठीं उमलें
  फुललें, मोहरलें, परिमळलें
  भावपराग उरीं थरथरले
लवूनिया लतिकेवर खालीं
भक्तिभाव हा बघशिल का ?

  अथांग महती जाणत अन्तर
  अलंकारलें श्रमून मन्दिर
  अवघें भंवतीं निर्मळ सुन्दर
जाणुनिया मम अथांग प्रीती
हृदयाशीं मज धरशिल का ?
क्षण एक तरी तूं येशिल का ?

नाशिक १९३८

## नेता

वीरा, अमित तुझा महिमा !

पहांटपक्षांचा हो आरव
ओसरुं लागे काळोखार्णव
उदे उमाठ्यावरती अभिनव
पूर्वेला सुषमा !

अगाध किमया तुझिया हातीं
फुलविसि पाषाणांतुन ज्योती
रजःकणांवर ये स्पर्शें ती
रत्नांचीच कमा !

शान्ततेंत तव भरे रणांगण
दयेमधें निर्दय आत्मार्पण
नम्रतेंत निर्धार विलक्षण
वैरांतहि प्रेमा !

पायदळीं पडलेल्या दलितां
रुधिरानें न्हालेल्या जगता
दीप दाविला तुवां प्रेषिता,
उजळायास तमा !

तव घर धरती, दौलत काम्बळ
सुमनाचें मन, वज्राचें बळ
ध्येयसाधनाला तव केवळ
क्षितिजाच्या सीमा !

येइल उदया सोन्याचा दिन
तुटेल हें पोलादी बन्धन
दिसतिल अगणित देव्हाऱ्यांतुन
तुझ्याच रे प्रतिमा ।

नाशिक १९३२

बालकवि

(कणिका)

हे अमर विहंगम ! गगनाचा रहिवासी !
त्या नीलसागरावरचा चतुर खलाशी !
प्रिय सखा फुलांचा, ओढयांचा सांगाती
त्यांच्यास्तव धुंडुनि ताराकण आकाशीं
आणसी धरेवर अक्षर या धनराशी !

मुंबई १९३८

## वनराणी

( जाति : द्राक्षकन्या )

घट हले शिरावर चरणचालिनें धुन्द
भिजवितें मुक्त—जल पदर रेशमी रुन्द
क्रीडतात कुन्तल कुरळ कपाळावरती
गुणगुणती कंकण करांत यौवन-छन्द !

डोंगरी हवेची देहलतेंत मिरास
कीं द्राक्षांचा घड मोहरला भरघोस
व्याधाचा नयनीं किरणविलास अधीर
वक्षावर बहरे नवतीचा उल्हास !

कान्तींत केतकी केवळ घवघवलेली
कचभुजंग मानेजवळी विळखा घाली
रविवरी उदेला प्रणयाग्नी ह्रदयांत
प्राचीसम म्हणुनी आरुणता ये गालीं !

पलिकडे खळाळे निर्मळ निळसर पाणी
उत्तुंग तरूंची उभी सभोंती श्रेणी
एकाकी धूसर पाउलवाट मधें ही
तिजवरून विहारे वनामधें वनराणी !

नाशिक १९३७

## देवाच्या दारीं

(अभंग)

नाम तुझें गाती गाती थोरसान
दारीं तुझ्या दीन दान घेती

चिखलांत येतां मूल माखोनिया
प्रेमें न्हाऊं तया घालतोसी

किंवा ज्याचा प्राण भुकें कासाविस
त्याला दोन घांस भरविसी

आणि येतां कोणी पांगळा वा खुळा
त्यालाहि तूं लळा लावितोसी

केव्हांचा रे उभा मीहि तुझ्या दारीं
उशीर कां परी आज असा ?

तूंच भक्तासाठीं सोसलीस झीज
आणि आतां नीज कशी आली ?

किंवा दारीं तुझ्या आलों रित्या करीं
म्हणोनिया दूरीं राहिलास !

अपेक्षिसी देवा, काय नजराणा ?
कारण तूं राणा जगताचा

पावलांत तुझ्या गुंतलेलें मन
काय अन्य धन माझ्यापाशीं ?

उधळित आज भक्तीचींच फुलें
डोळे तुझे ओले करीन मी!

तूंच पाठविलें हाटांत या मला
नाहीं कोणी दिला वाटाड्याही

वाटा कितीतरी तूंच निर्मिल्यासे
बालमन कसें चुकेल ना?

तूंच दिले माझ्या डोईवरी ओझें
पंकीं पाय माझे रुतविले

तूंच जागोजाग मांडलेसी खेळ
राहिला न वेळ ध्यानीं माझ्या

आणि आतां होतां वेळ परताया
कां रे देवराया कोपसी तूं?

१९३२

— २ —

कोण्या वैभवांत होउनिया लीन
विसरसी दीन लेकरांना?

म्हणतात तुझ्या दयेला न अन्त
पुकारती सन्त थोरी तुझी

चिमण्यांच्या घरा लावसी मशाल
केवढी विशाल दया तुझी!

जळांतले जीव तापल्या दुपारीं
वाळवंटावरी ओढसी तूं

पाहसी तूं शांत त्यांची तगमग
कोणाचा हा राग कोणावरी ?

कोण गुन्हेगार क्षमावन्त देवा
क्षमेचा अन् ठेवा कोणासाठीं ?

तुझ्या महिम्याचीं प्रचंड पुराणें
गमती तराणे अर्थहीन !

तुझी पाषणानें पहिलीच मूर्ति
घडविली, मति थोर त्यांची !

आणि आतां त्याच मूर्ति पुजवून
वेडें विडम्बन करतात !

असो, भलेंबुरें वदलीसे वाचा
काय मानायाचा त्याचा राग

निखाऱ्यांत बद्ध असतांना पाय
अपेक्षिसी काय संकीर्तन !

१९३७

— ३ —

आणि आज मन शंकित हें होई
आहेस कीं नाहीं मुळांत तूं

मित्या भावनेला शोधायासी धीर
पाषाणास थोर मींच केलें

दुर्बलता माझी दडवाया गेलों
अधिक जाहलों दुर्बल मी

टाकूनिया शस्त्र सोडूनिया रण
वांचवाया प्राण येथें आलों

भीरुतेंत माझ्या तुझें संगोपन
मींच केलें मन रंजवाया

परततों आतां रणांत माघारा
शूरांना निवारा समरांत

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
व्यर्थ हा पुकार ... तुझ्या दारीं

आहेस कीं नाहीं आज नसे चिंता
दोहींमधें आतां भेद नुरे

१९३९

अनुक्रम ... दि: ...
क्रमांक ... नों: दि: ...

## टिळकांच्या पुतळ्याजवळ

( जाति : द्राक्षकन्या )

पुळणींत टेकलें माथें श्रांत अधीर,
दर्यावर होता वाहत मन्द समीर,
काजळलेले होते गगनाचे कांगोरे,
कल्लोळत अन्तरिं कांहिं तरी काहूर !

उद्दाम निराशा करि तांडव हृदयांत,
घोंगावे वादळ जेंवीं जीर्ण गडांत,
सांदींत बसूनी रातकिड्यांची सेना
निज आक्रोशानें निनादवी घन रात !

तों वळले डोळे नकळत बाजुस वरती,
दृष्टींत डोंगरापरी भरे ती मूर्ति,
क्षण एक आंतला शान्त गल्बला झाला
ओसरतां वारा जशी स्थिरावी ज्योती.

ती कणखर मूर्ती धीट मराठी थाट
आदळतो जीवर अजून पश्चिम–वात,
ती अजिंक्य छाती ताठर अन् रणशील
जी पाहुन सागर थबके, परते आंत !

कङ्गाल खोपटीं कोळ्यांचीं पायाशीं
वर असीम गगनीं नक्षत्राच्या राशी,
तम–लांछित सागर पसरे या बाजूस,
उन्मत्त गोपुरें दूर टेकडीपाशीं !

तें होतें जीवित—हातीं धरुनि हताश
खळखळती ज्यांवर दृढ पोलादी पाश
ध्वज चढवायाची एक अदम्य मनीषा
तें होतें जीवित—अन् हा जीवितभास !

कण क्षुद्र घेउनी सुखदु:खांचे हातीं,
धापावत आम्ही जीवनमार्गावरती,
पर्णापरि वाऱ्यावरती हलतों, डुलतों
जों धुळींत लाभे अखेरची विश्रांती !

हें जीवन कसलें, ही मरणांची माला,
मासोळी झटते तोडायास गळाला,
दर्यावर वाहे दुभंगलेली नाव
क्षण खालीं वरती, क्षणांत आणि तळाला

मुंबई १९३६

## समिधाच सख्या या

दूरस्थ कुणी दे तुझ्या करीं ही कविता
वाहते जिच्यांतुनि त्याची जीवन–सरिता,
खळखळे, अडखळे, सुके, कधीं फेसाळे
परि अखंड शोधे वाट समुद्राकरितां !

खडकाळ प्रान्त तो ही जेथून निघाली.
पथ शोधित आली रानांतून अकेली,
नच रम्य राउळे, कलापूर्ण वा घाट
तीरावर तुरळक परि अंकुरती वेली !

नव पर्णांच्या या विरल माण्डवाखालीं,
होईल सावली कुणा, कुणास कहाली,
तोषेल कुणी, शापील कुणी दुर्वास,
“ या जळोत समिधा–भव्य हवी वृक्षाली ! ”

समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा,
कोठून फुलापरि वा मकरन्द मिळावा ?
जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा,
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा !

पुणें १९४०

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........

# विशाखा

कवि

कुसुमाग्रज

स्कूल ॲण्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

किंमत रु. २=५०

प्रकाशक :
दामोदर नारायण मोघे, बी.ए.
स्कूल अॅण्ड कॉलेज बुकस्टॉल,
कोल्हापूर.

मुखपृष्ठ चित्रकार : श्री. दीनानाथ दलाल
आवृत्ति पांचवी : जुलै १९५९
सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक :
सदाशिव रामचंद्र सरदेसाई,
बी.ए., एल्‌एल्‌.बी.,
नवीन समर्थ विद्यालयाचा 'समर्थ भारत'
छापखाना, ४१ बुधवार, पुणें २

दादा आणि माई
यांच्या स्मृतीस

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| दूर मनोऱ्यांत | १ |
| हिमलाट | २ |
| स्वप्नाची समाप्ति | ३ |
| ग्रीष्माची चाहूल | ६ |
| अहि-नकुल | ८ |
| किनाऱ्यावर | ११ |
| अवशेष | १३ |
| मातीची दर्पोक्ति | १५ |
| गोदाकांठचा संधिकाल | १८ |
| स्मृति | २० |
| हा कांठोकांठ कटाह भरा | २१ |
| आगगाडी व जमीन | २३ |
| क्रांतीचा जयजयकार | २६ |
| जालियनवाला बाग | २९ |
| जा जरा पूर्वेकडे | ३० |
| तरीही केधवा | ३२ |
| मूर्ति-भंजक | ३४ |
| कोलंबसाचें गर्वगीत | ३८ |
| आस | ४० |
| बळी | ४१ |
| लिलांव | ४३ |
| पृथ्वीचें प्रेमगीत | ४४ |
| गुलाम | ४६ |
| सहानुभूति | ४८ |
| सात | ४९ |
| माळाचें मनोगत | ५१ |
| ऋण | ५३ |
| उमर खैयाम | ५४ |
| विजयोन्माद | ५५ |
| शेवटचें पान | ५६ |
| उषःकाल | ५८ |
| तूं उंच गडीं राहसि | ६० |
| प्रीतीविण | ६१ |
| नदीकिनारीं | ६२ |
| पाचोळा | ६३ |
| बंदी | ६४ |
| आव्हान | ६५ |
| बायरन | ६६ |
| प्रतीक्षा | ६७ |
| आश्वासन | ६९ |
| प्रकाश प्रभु | ७० |
| मेघास | ७१ |
| भाव-कणिका | ७२ |
| ध्यास | ७४ |
| निर्माल्य | ७५ |
| जीवन-लहरी | ७६ |
| पावनखिंडींत | ७८ |
| सैगल | ७९ |
| कुतूहल | ८० |
| असलि कुठें तूं | ८१ |
| भक्तिभाव | ८३ |
| नेता | ८४ |
| बालकवि | ८६ |
| वनराणी | ८७ |
| देवाच्या दारीं | ८८ |
| टिळकांच्या पुतळ्याजवळ | ९२ |
| समिधाच सख्या या | ९४ |

# अर्ध्यदान

## [ पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना ]

रत्नहाराचें तेजस्वी सौंदर्य कुणाला समजावून सांगावें लागत नाहीं. डोळयांना तें आपोआपच जाणवतें. रातराणीच्या सुगंधाची कुणी चर्चा करीत बसत नाहीं. वाऱ्याच्या झुळुकेबरोबर तो आला कीं मन क्षणार्धांत प्रसन्न होऊन जातें. लहान मुलांच्या नाजूक पाप्याची अवीट गोडी कळायला पुस्तकी पांडित्याची आवश्यकता नाहीं. एकाच स्पर्शांत ओठांना त्या अमृताची माधुरी कळते. सुंदर आणि सजीव कवितेचेंही असेंच आहे. तिला प्रस्तावना हवी कशाला? असें असूनही कुसुमाग्रजांची कविता आणि रसिक यांच्यामध्यें येऊन मी थोडी लुडबुड करीत आहें, याला अनेक कारणें आहेत. मराठी वाचकांच्या अभिजात काव्यप्रेमाला ओहोटी लागल्यानंतरच्या काळांत–गेल्या दशकांत–कुसुमाग्रजांचा उदय झाला. त्यामुळें नामांकित मासिकांतून त्यांची कविता प्रसिद्ध झाली असूनही तिचा व्हावा तितका प्रसार अथवा बोलबाला होऊं शकला नाहीं. कुसुमाग्रज गायक कवि असते तर कविता लोकप्रिय करण्याचा एक मार्ग तरी त्यांना मोकळा राहिला असता! पण त्याचाही त्यांनीं कधीं अवलंब केल्याचें दिसत नाहीं. याचें कारण त्यांचा संकोची स्वभाव असेल किंवा गोड गळयाचा अभाव असेल! गातां येत नसलें तरी अन्य प्रकारच्या अनुकूलतेमुळें आपल्या कवितेच्या चुटक्यांचें कित्येकांनीं जें कौतुक करून घेतलें, तें पदरांत पाडून घेण्याइतकें व्यवहारकौशल्यही त्यांच्या अंगीं नाहीं. जाहिरात ही कलियुगांतील पासष्टावी कला आहे असें म्हणतात. पण आजकाल सिनेमापासून साहित्यापर्यंत सर्वत्र दृष्टि फेकली तर या पासष्ट कलांत जाहिरातीचाच नंबर हटकून पहिला लागेल! बिचाऱ्या कुसुमाग्रजांची या कलेंतहि गति नसल्यामुळें अधूनमधून प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या ओजस्वी काव्याचें व्हावें तितकें स्वागत कधींच झालें नाहीं! शिवाय गेल्या दशकांत काव्यप्रदेशावर बोलपटसृष्टीचें आक्रमण वाढत्या प्रमाणांत सुरू झालें आहे. कुसुमाग्रजांच्या कवितेच्या रसग्रहणाला तेंहि थोडेंसें मारक झालें, असेंच म्हणावें लागेल. बोलपटांतलीं गाणीं नुसतीं

ढंगदार असलीं तरी तीं चटकन् लोकप्रिय होतात. त्या गाण्यांत कल्पनेची उत्तुंग विशालता अथवा भावनेची उत्कट आर्तता बहुधा नसते. किंबहुना हे गुण तिथें अवगुणच ठरण्याचा संभव असतो. शब्दांचा नट्टापट्टा आणि स्वरांचा नखरा एवढ्या भांडवलावर चित्रपटांतलीं गाणीं लोकांच्या जिभेवर खेळूं लागतात! वृक्षराजींतून चमकणाऱ्या काजव्यांकडे लोक पुनः पुन्हां कौतुकानें पाहतात; पण क्षणार्धात आकाश उजळून जाणाऱ्या विजेचें दर्शन होतांच ते डोळे मिटून घेतात! तसाच कांहींसा प्रकार चित्रपटांतलीं पदें आणि अभिजात काव्यें यांच्या बाबतींतहि सध्यां होऊं पाहत आहे.

प्रीतीप्रमाणें कीर्तीचाही मार्ग सरळ नसतो हें कटु सत्य कुसुमाग्रजांच्या अनुभवाला थोडेंफार आलें असलें तरी आजच्या साहित्यक्षितिजावरील एक तेजस्वी तारा या दृष्टीनें त्यांच्याकडे अनेक रसिक पाहत आले आहेत यांत मात्र शंका नाहीं. प्रतिभासंपन्न कवीपासून कर्तबगार देशसेवकापर्यंत विविध मनोवृत्तींच्या लोकांना त्यांच्या कवितेनें मोहिनी घातली आहे. वाचनालयाच्या भिंतीपासून तुरुंगाच्या भिंतीपर्यंत किती तरी ठिकाणीं त्यांच्या तेजस्वी वाणीचे पडसाद उमटले आहेत. आणि असें व्हावें यांत नवल तें काय? केशवसुत, टिळक, बालकवि वगैरे कवि महाराष्ट्राचे कालचे कवि होते. तांबे–यशवंत–काणेकर इत्यादि कवि महाराष्ट्राचे आजचे कवि आहेत. पण महाराष्ट्राच्या किंबहुना हिंदभूमीच्या उद्यांच्या आशा–आकांक्षांचे उद्गाते म्हणून ज्यांच्याकडे अभिमानानें बोट दाखवितां येईल अशा तरुण मराठी कवींची आपण गणना करूं लागलों तर कुसुमाग्रजांच्या नांवानें अनामिकाच चालावी लागेल. टिळक जसे फुलांमुलांचे कवि होते किंवा गोविंदाग्रज जसे कल्पनारम्य प्रणयाचे कवि होते, तसे कुसुमाग्रज हे मानवतेचे कवि आहेत. आजच्या सामाजिक असंतोषाचा ज्वालामुखी त्यांच्या कवितांतून इतर काव्यांप्रमाणें नुसता धुमसत नाहीं, तो अग्निरसाचा वर्षाव करीत सुटतो. या काव्यसंग्रहाच्या उपसंहारांत ते वाचकाला आपल्या कवितेविषयीं सांगतात–

‘ समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा
कोठून फुलांपरि वा मकरंद मिळावा?
जात्याच रुक्ष या एकच त्या आकांक्षा
तव आंतर अग्नी क्षणभर तरि फुलवावा. ’

कुसुमाग्रज आपल्या कवितांना रुक्ष समिधा म्हणून संबोधतात. पण मला वाटतें, त्यांच्या प्रतिभेला उपमा द्यायचीच असली तर ती शमी-वृक्षाची देतां येईल. त्या वृक्षाप्रमाणें तिच्या अंतरंगांत दाहक अग्नि तर आहेच, पण अज्ञातवासांतून मुक्त होतांना शमीवृक्षानें पांडवांना त्यांचीं शस्त्रें जशीं अधिक तेजस्वी करून दिलीं त्याप्रमाणें विषमता, पिळणूक, गांजणूक आणि अन्याय यांच्याविषयींची बहुजनसमाजाची चीड कुसुमाग्रजांनीं अत्यंत उत्कट आणि सुंदर स्वरूपांत आपल्या काव्यांतून व्यक्त केली आहे. बळी (पृ. ४१), लिलांव (पृ. ४३), सहानुभूति (पृ. ४८), माळाचें मनोगत (पृ. ५१), पाचोळा (पृ. ६३) इत्यादि कविता या दृष्टीनें अतिशय सरस आहेत. गरिबांनीं मरमर मरावें नि श्रीमंतांनीं त्यांच्या जिवावर चरावें हा आजचा विषम समाजांतला सर्वांत मोठा अन्याय आहे. या अन्यायाला बळी पडलेल्या एका साध्याभोळ्या निष्पाप जीवाचें कवीनें 'बळी' या कवितेंत केलेलें वर्णन आंतडें पिळवटून टाकील असेंच आहे. 'लिलांव' या कवितेंत भांडवलशाही समाजरचनेंत सावकाराच्या टांचेखालीं चिरडल्या जाणाऱ्या शेतकऱ्याचें कवीनें केलेलें चित्रण कुणाला हृदयस्पर्शी वाटणार नाहीं? कष्ट करून अर्धपोटीं राहणाऱ्या त्या बापड्याच्या झोंपडींतून, धान्य, बाजलें, थाळी, गाडगींमडकीं वगैरे सर्व वस्तु लिलांवाकरितां बाहेर काढल्या जातात! त्याचें उपाशीं पोर भुकेनें व्याकूळ होऊन रडूं लागतें! गरीब बिचारी शेतकरीण त्याला शांत करण्याकरितां पाजूं लागते! लगेच सावकाराचें लक्ष तिच्याकडे जातें; आणि—

'ऊर उघडें तें तिचें न्याहळोनी
थोर थैलींतिल वाजवीत नाणीं
'आणि ही रे!' पुसतसे सावकार
उडे हास्याचा चहुंकडे विखार!'

ज्या समाजरचनेंत गरिबाच्या जगण्याच्या हक्काचा आणि स्त्रीच्या शीलाचा असा लिलांव मांडला जातो, ती समाजरचना शक्य तितक्या लवकर नष्ट झाली पाहिजे असा त्वेष वाचणाऱ्याच्या मनांत उत्पन्न करण्याची शक्ति या कवितेंत निःसंशय आहे. 'सहानुभूति' या कवितेंत गरिबालाच गरिबाविषयीं कळकळ वाटते असें कवीनें सूचित केलें आहे. 'माळाचें मनोगत' व 'पाचोळा'

या कवितांतही दलितांच्या गांजणुकीचें चित्र कवीनें किती सहृदयतेनें काढलें आहे! माळाचें सारें जीवन उजाड एकलकोंडें–सुखशून्य! स्वर्गात कुठें–तरी नंदनवन आहे असें त्यानें ऐकलेलें असतें. वनें आणि उपवनें यांचीं सौंदर्यवर्णनेंही त्याच्या कानांवर पडलेलीं असतात. पण या ऐकीव गोड गोष्टींपैकीं एकही त्याच्या वांटयाला येत नाहीं. साधी वेलसुद्धां त्याला सोबत करीत नाहीं. मग फुलांची गोष्ट कशाला हवी? तो एकसारखा मनांत झुरत राहतो—

'वाटतें बुलबुल कोयळ यावे
मंजूळ संगीत तयांनीं गावें
जीवन जाणीव सारी
विरावी घटकाभरी
येऊन कधीं तें घुबड मात्र
भीषण भासवी अधिक रात्र'

आणि असल्या भकास जीवनाला कंटाळून गेलेला माळ शेवटीं उद्‌गारतो—

'कशास आयुष्य देवा, इतुकें
शतकामागून जाती शतकें!'

हें दीन, दरिद्री आणि दुःखमय जीवन दलितवर्ग पिढयान्‌पिढया कंठीत आहे! पण झोंपडींत राहणारांची पर्वा महालांतल्या मिरासदारांनीं कधीं केली नाहीं आणि बंगल्यांतले बडे लोक कधीं करणार नाहींत! एक साधीच गोष्ट घ्या. बुद्ध, एकनाथ आणि गांधीजी यांच्यासारख्या महात्म्यांनीं, उक्तींनीं आणि कृतींनीं समाजाला माणुसकी शिकविण्याचा निकराचा प्रयत्न केला असेल! पण अद्यापिही अस्पृश्यतेचें पिशाच्च हिंदुस्थानांत नंगा नाच घालीत आहे! बारा बारा तास नळाचें पाणी मिळत असल्यामुळें खेडेगांवांतून किंबहुना कित्येक मोठ्या गांवांतूनही कळशीभर पाण्याकरितां हरिजनांना जे हाल भोगावे लागतात त्याची आम्हांला कल्पनाही करतां येत नाहीं. भागवतधर्माच्या, भूतदयेच्या नि सामाजिक सुधारणेच्या मलमपट्ट्या लावून विषमतेचा हा रोग नाहींसा करण्याचा संतांनीं आणि सुधारकांनीं पिढयान्‌-पिढया प्रामाणिक प्रयत्न केला. पण शस्त्रक्रियेचें काम मलमपट्ट्या करूं शकत नाहींत एवढेंच त्यांतून पुनः पुनः सिद्ध झालें. आमच्यांतले उदारमतवादी

श्रीमंत आपल्या मंद मुलांनासुद्धां शिक्षणाकरतां परदेशीं पाठविण्याच्या कल्पनांत गुंग होऊन राहतील! पण हरिजनांच्या साक्षरतेकरतां स्वतःच्या तिजोरीचें कुलूप मात्र ते कधींही उघडणार नाहींत! आमच्यांतले सुधारक-वृत्तीचे सुखवस्तु लोक वर्षातून एक वेळ सहभोजन करून कृतकृत्य होतील. पण दलितवर्गाचे अनेक प्रश्न त्यांना तीनशेंपासष्ट दिवस दोन्ही वेळां भरपूर जेवायला मिळाल्याखेरीज सुटणार नाहींत, या गोष्टीची मात्र ते दखल घेणार नाहींत! आणि या सर्वांचा परिणाम म्हणजे दलितांच्या पोटीं जन्माला आलेल्या गुणी माणसालाही दलितच व्हावें लागतें. आर्थिक, बौद्धिक आणि सामाजिक गुलामगिरींतून मुक्त होण्याचा एकसुद्धां मार्ग या उपेक्षितांना आम्हीं मोकळा ठेवलेला नसतो. 'पाचोळ्या'च्या रूपानें कुसुमाग्रजांनीं दलितवर्गाच्या या कारुण्यपूर्ण जीवनाचें किती भेदक चित्रण केलें आहे! झाडाच्या पायथ्याशीं पडलेल्या पाचोळ्याला उषा हंसवूं शकत नाहीं अथवा रात्र रिझवूं शकत नाहीं. झाडावरलीं हिरवींगार पानें आणि झाडाखालचें हिरवेंगार गवत हीं सदैव हंसून त्याचा उपहास करीत असतात. वाटसरू त्याला तुडवून जातो. पण बिचारा पाचोळा शांतच असतो. शेवटीं—

'आणि अंतीं दिनिं एक त्या वनांत
येइ धांवत चौफेर क्षुब्ध वात
दिसे पाचोळा, घेरुनी तयातें
नेइ उडवुनि त्या दूर दूर कोठें!'

आणि पुढें?—
पुढें काय?

'आणि जागा हो मोकळी तळाशीं
पुन्हां पडण्या वरतून पर्णराशी!'

हीं सारीं सामाजिक दुःखें नाहींशीं कशीं व्हायचीं? जुना धर्म, जुनी नीति, जुनी समाजरचना म्हणते 'देवाला शरण चला. तो दयाघन आहे. सर्व दुःखांचा परिहार करण्याला तोच समर्थ आहे!' पण हा उपदेश भोंदूपणाचा नसला तरी मूर्खपणाचा आहे हें कुसुमाग्रजांना कळून चुकलें आहे. मानवजातीनें ज्या दिवशीं दगडांतून देव निर्माण

करून त्याच्यापुढें आपलें डोकें वांकविलें, त्याच दिवशीं तिनें आपल्या प्रगतीच्या मार्गांत एक अनुल्लंघनीय धोंड निर्माण करून घेतली. हा काल्पनिक देव दुर्बळांचा मित्र होऊं शकत नाहीं. तो सत्ताधाऱ्यांना आणि संपत्तिवाल्यांना मात्र साहाय्य करूं शकतो. म्हणूनच 'देवाच्या दारीं' या कवितेंत कुसुमाग्रज देवाची जी संभावना करतात ती अगदीं यथार्थ वाटते.

'म्हणतात तुझ्या दयेला न अन्त
पुकारती सन्त थोरी तुझी
चिमण्यांच्या घरा लावसी मशाल
केवढी विशाल दया तुझी !
जळांतले जीव तापतां दुपारीं
वाळवंटावरी ओढसी तूं !
तुझ्या महिम्याचीं प्रचंड पुराणें
गमती तराणे अर्थहीन !'

अनुभवांतीं देव दगड ठरतो ! पण मनुष्य कांहीं केल्या दगड होऊं शकत नाहीं. आपला उद्धार आपणच केला पाहिजे याची जाणीव त्याला हळुहळू होऊं लागते. सारें सामाजिक तत्त्वज्ञान या जाणिवेंतूनच निर्माण होतें. पण स्वार्थ संभाळून आणि स्वतःचें उच्च आसन उच्च राहील, किंबहुना उच्चतम कसें होईल याचीच काळजी बाळगून जी सुधारणा केली जाते, ती समाजाच्या तळापर्यंत पोंचूं शकत नाहीं. वणवा विझवायला रंग-पंचमीच्या पिचकाऱ्या आणि म्युनिसिपालिटीचे बंब कसे उपयोगीं पडणार ? हळव्या पण आत्मनिष्ठ सुधारकांचा हा दुबळेपणा मानवतेला प्रचित झाला कीं क्रांतीची कल्पना जन्माला येते. क्षणाक्षणानें आणि कणाकणानें सुधारणा होऊन मानवजात सुखी होईल हा भोळा आशावाद मागें पडतो आणि क्रांतीचें निशाण हातांत घेतलेल्या समतादेवीकडे समाजाचे डोळे लागतात. 'हा कांठोकांठ कटाह भरा' (पृ. २१), 'आगगाडी व जमीन' (पृ. २३), 'जा जरा पूर्वेकडे' (पृ. ३०), 'गुलाम' (पृ. ४६), 'बंदी' (पृ. ६४) इत्यादि अनेक तेजस्वी कवनांतून कुसुमाग्रजांनीं क्रांतीच्या दर्शनाचा मानवजातीला लागलेला ध्यास मोठ्या तन्मयतेनें वर्णन केला

आहे. त्यांची कल्पकता प्रत्येक वेळीं नव्या नव्या सुंदर रूपकांचा आश्रय करून या ध्यासाचें चित्रण करते. 'हा कांठोकांठ कटाह भरा' या कवितेंत नव्या जगाच्या उदयाची सूर्योदयाशीं केलेली तुलना मोठी मनोरम आहे. जुनें स्वप्नाळू जीवन टाकून देऊन नव्या वास्तव जीवनक्रमाला आपण सिद्ध झालें पाहिजे असा संदेश देतांना कवि म्हणतात—

'नभिं लागे तारांचें मोहळ,
भुलवी त्याची क्षणिक प्रभावळ,
रात्रींचे हे आश्रित केवळ,
ही मशाल त्यावर धरा जरा.
हा कांठोकांठ कटाह भरा !
या त्रिभुवन उजळित प्रभाकरा'

'आगगाडी व जमीन' या कवितेंत कवीची कल्पकता व त्याची प्रेरकता यांच्यामध्यें जणूं कांहीं शर्यतच लागली आहे ! दलितवर्गावर होणाऱ्या जुलमाचें आणि त्याच्या प्रतिक्रियेचें या कवितेंतलें चित्रण अत्यंत प्रभावी आहे. अशा प्रकारच्या सर्व कवितांतून कुसुमाग्रज एकच तुतारी फुंकीत आहेत—जुनें जग मृत्यूच्या दारांत हतबल होऊन पडलें आहे. हुकुमशाही, साम्राज्यशाही, भांडवलशाही, भिक्षुकशाही इत्यादिकांनीं त्याचें पुरें पुरें रक्तशोषण केलें आहे. आजकालचीं भीषण महायुद्धें हे त्या जुन्या जगाचे शेवटचे आंचके आहेत. या जुन्या जगाला अजूनही एखाद्या संजीवनीनें जगवितां येईल ही कल्पना अगदीं खोटी आहे. त्या जगाची जागा आतां नव्या जगानेंच घेतली पाहिजे. पण नवें जग सुखा-सुखी निर्माण होत नाहीं. प्रीतीप्रमाणें क्रांतीचीही एकच कसोटी आहे—ती म्हणजे त्याग. म्हणूनच भविष्यकाळांतल्या समतेचीं गोड स्वप्नें पाहणारे, मानवजात इथून तिथून एक आहे अशी श्रद्धा बाळगणारे आणि स्वतःच्या रक्ताच्या अर्घ्यावांचून नव्या जगांतला पहिला सूर्य उगवणार नाहीं ही खात्री झालेले लेनिन आणि जवाहिरलाल यांच्यासारखे निरनिराळ्या देशांतले अत्यंत श्रेष्ठ असे ध्येयवादी एकच जयघोष करीत या नव्या सूर्याचें स्वागतगीत गात असतात—

'मृत्युंजय आम्ही! आम्हांला कसलें कारागार ?
अहो हें कसलें कारागार!
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार!

पदोपदीं पसरून निखारे आपुल्याच हातीं
होउनिया बेहोष धांवलों ध्येयपथावरतीं
कधिं न थांबलों विश्रांतीस्तव, पाहिलें न मागें
बांधुं न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे.
एकच तारा समोर आणिक पायतळीं अंगार
होता पायतळीं अंगार
गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार!

या ओळी वाचल्या कीं नाशिकच्या गोदेच्या पाण्यांत कांहीं तरी विशेष सामर्थ्य आहे असें वाटूं लागतें. सावरकर आणि गोविंद यांच्या-प्रमाणें नियतीनें कुसुमाग्रजांचा नाशिकशीं निकटचा संबंध आणला तो कांहीं उगीच नाहीं.

आजच्या सामाजिक जीवनांतल्या अश्रु, असंतोष, चीड, त्वेष इत्यादि सान्या गोष्टी कुसुमाग्रजांच्या कवितेंत आढळतात. पण या सर्वांचें नुसतें चित्रण करून ते थांबत नाहींत. त्यांचे अश्रु दुबळे नाहींत. त्यांतून दुर्दम्य आशावादाच्या ठिणग्या उडत आहेत. 'दूर मनोऱ्यांत (पृ. १), 'कोलंबसाचें गर्वगीत' (पृ. ३८) आणि 'सात' (पृ. ४९) या बाह्यतः अत्यंत भिन्न अशा तीन कविता पाहाव्यात. म्हणजे परिस्थितीची भीषणता पूर्णपणें जाणवत असूनही कुसुमाग्रज गोंधळून किंवा भांबावून गेलेले नाहींत याची खात्री होईल.

'मार्ग आमुचा रोधूं शकती ना धन ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचें निशाण मिरवूं महासागरांत
जिंकुनी खंड खंड सारा'

या कोलंबसाच्या गीतांतल्या त्यांच्या ओळी नवें जग निर्मू पाहणाऱ्या आजच्या मानवालाही मार्गदर्शक आहेत! नाहीं कां?

आजच्या समाजरचनेच्या कुजलेल्या अंतरंगाचें भेदक चित्रण करणारा हा कवि प्रचारक असलाच पाहिजे अशी अनेकांची स्वाभाविक समजूत होईल. पण कुसुमाग्रजांची प्रतिभा स्वभावतः प्रचारक नाहीं. ती कल्पक आहे; निर्माणक (Creative) आहे. खरा कलावंत प्रचार करीत नाहीं; तो त्याच्या कलाकृतींतून आपोआप होत असतो, या सिद्धांताचीं हवीं तेवढीं उदाहरणें या संग्रहांत मिळतील. कुसुमाग्रजांइतकी अष्टपैलू कल्पकता मराठींतल्या फारच थोड्या लेखकांच्या वांट्याला आली असेल. 'मातीची दर्पोक्ति' (पृ. १९), 'आगगाडी व जमीन' (पृ. २३), 'माळाचें मनोगत'(पृ.५१) इत्यादि कवितांतला कल्पकतेचा विलास पाहिला कीं शिवरामपंत परांजप्यांच्या चमत्कृति आणि उपरोध यांनीं नटलेल्या प्रतिभेची आठवण होते. 'मूर्तिभंजक' (पृ. ३४) ही कविता वाचतांना रवींद्रनाथ किंवा खलिल गिब्रान यांची उत्तुंग कल्पकताच आपणांपुढें उभी आहे असा भास होतो. 'पृथ्वीचें प्रेमगीत' वाचून विशाल कल्पनेच्या पंखांवर बसून अनंताची आरती गाणाऱ्या सावरकरांचें आणि रुद्राला आवाहन करणाऱ्या तांब्यांचें स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. कवितेच्या आत्म्यापासून तो तिला वस्त्राभूषणांनीं नटविण्यापर्यंत किंबहुना तिचें कुंकू अगदीं रेखीव करण्यापर्यंत कुसुमाग्रजांची कल्पकता सिद्धहस्त आहे. सैगलला उद्देशून त्यांनीं लिहिलेल्या खालील ओळी किती सार्थ आणि सुंदर आहेत--

'शब्दाशब्दाच्या घटांतून ओसंडे भाव
पारिजातकांच्या कळयांचा कोमल वर्षाव

हृदयांतील रणें जाहलीं क्षणामधें शांत
आणि विस्मृतीच्या नाहली चांदण्यांत रात'

'स्वप्नाची समाप्ति' हें अतिसुंदर प्रेमगीत म्हणजे कुसुमाग्रजांच्या कल्पकतेनें कांठोकांठ भरलेला अमृतकलश आहे. ही कविता कितीही वेळां वाचली तरी रसिकमनाची तृप्ति होणार नाहीं आणि तिच्यांतली ती एक ओळ तर जणूं कांहीं एखाद्या सुंदर देवालयाचा सोनेरी कळसच—

‘ काढ सखे गळयांतील तुझे चांदण्याचे हात ’

इतकें कोमल वर्णन करणारा कवि सळसळत येणाऱ्या नागाचें वर्णन कसें करतो तें पहा—

‘ कधिं लवचिक पातें खड्गाचें लवलवतें
कधिं वज्र धरेवर गगनांतुनि कडकडतें
कधिं गर्भरेशमी पोत मधें जरतार
प्रमदेचें मादक वस्त्र जणूं सळसळतें ’

या ऐटदार चित्रणानंतर ‘ गोदाकांठचा संधिकाल ’ या वातावरणात्मक कवितेकडे वळलें कीं कवीच्या कल्पकतेचें अधिकच कौतुक वाटूं लागतें. या उदासरम्य वातावरणाचें तो असें वर्णन करतो—

‘ वाडा पडका नदीतटावर
भग्न अपुल्या प्रतिबिंबावर
गंगेमधल्या खिन्नपणानें लावितसे दृष्टि.
पाचोळ्यावर कांहीं सळसळ
कसली डोहावरती खळबळ
पाउल वाजे रजनीचें का येतांना जगतीं ? ’

अशा अभिजात व अष्टपैलू कल्पकतेमुळेंच ‘ स्मृति ’ ( पृ. २० ), ‘ तरीही केधवां ’ ( पृ. ३२ ), ‘ आस ’ ( पृ. ४० ), ‘पृथ्वीचें प्रेमगीत’ ( पृ. ४४ ), ‘ शेवटचें पान ’ ( पृ. ५६ ), ‘ प्रीतीविण ’ ( पृ. ६१ ), ‘ प्रतीक्षा ’ ( पृ. ६७ ), ‘ आश्वासन ’ ( पृ. ६९ ), ‘ कुतूहल ’ (पृ. ८०) इत्यादि सुरस प्रेमगीतेंही कुसुमाग्रज लिहूं शकले. त्यांचीं हीं गीतें विपुल नसलीं तरी विविध आहेत. त्यांत विरहाची तळमळ आहे, स्मृतीचें समाधान आहे, प्रीतीनें पराक्रमाच्या आड येऊं नये ही उत्कट इच्छा आहे, प्रियजनांकरितां त्यागाची तयारी आहे आणि प्रीति ही क्रीडा मानून भोळ्याखुळ्या जीवांना खेळविणाऱ्या आणि मातीला मिळविणाऱ्या धुंद मस्तीचेंही चित्रण आहे. या प्रेमगीतांतल्या खालील ओळी रसिकांच्या जिभेवर नेहेमींच खेळत राहतील—

'प्रीतीस नको तख्त–नको ताजमहाल
प्रीतीस हवी प्रीति–वृथा खंत कशाला ?'

पृथ्वी आपल्या प्रेमगीतांत सूर्याला सांगते—

'परी भव्य तें तेज पाहून पूजून
घेऊं गळयाशीं कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहुनी साहवे !'

रसाळ द्राक्षांचा घोस हातांत घेतल्यावर तो संपेपर्यंत कधीं कुणी थांबला आहे का ? गोदावरीच्या पवित्र परिसरांत वाढलेल्या या प्रतिभा-संपन्न कवीचा हा संग्रहही तितक्याच आतुरतेनें रसिक वाचतील अशी माझी खात्री आहे. आतां द्राक्षांच्या पिकलेल्या घोसांतहि एखादें द्राक्ष आंबट दिसतें किंवा एखादें टोकाला कुठें तरी लागलेलें असतें. कुसुमाग्रजांच्या काव्यांतही असे लहानसहान अनेक दोष आहेत. क्वचित् दोन विसंगत कल्पनांचा संकर आढळेल, कुठें तरी वृत्ताचें नांव देतांना किंवा मात्रा मोजतांना दुर्लक्ष झालेलें दिसून येईल, अधूनमधून ऱ्हस्वदीर्घांची केलेली ओढाताण कर्णकटु वाटेल आणि कांहीं थोड्या कविता रसपरिपोषाच्या अभावीं फारशा आकर्षक वाटणार नाहींत. पण या किरकोळ दोषांचें प्रदर्शन करण्याला आतां जागाच उरली नाहीं; आणि ती उरली असती तरी त्याविषयीं अधिक चर्चा करण्यांत स्वारस्य नाहीं. समुद्राच्या फेंसाळलेल्या लाटांवर गवताच्या काड्या नेहमींच तरंगत असतात. परंतु समुद्रांतून प्रवास करणाऱ्यांचें लक्ष त्या काड्यांकडे असत नाहीं. तो लाटांचा पाठशिवणीचा खेळ पाहण्यांतच गुंग होऊन जातो.

टिळक, तांबे किंवा यशवंत यांच्या काव्यांत जीवनांतल्या अनुभवांचीं जेवढीं विविध प्रतिबिंबें पडलीं आहेत तेवढीं या संग्रहांत आढळणार नाहींत हें खरें; पण ही उणीव स्वाभाविकच आहे. अजून कुसुमाग्रज जीवनाच्या उंबरठ्यावरच उभे आहेत. ते जसजसे त्याच्या अंतरंगांत प्रवेश करतील, तसतसें त्यांच्या काव्यविषयांचें वैचित्र्य वाढेल. त्यांची प्रतिभा ही लुकलुक करणारी चांदणी नाहीं; ती चमचम करणारी बिजली आहे. जीवनाच्या

क्र. क्र. १०५८... २६

आकाशाचा कोपरान् कोपरा तीं उद्यां उजळूं शकेल. आपली कविता ही मुरली नाहीं; ती तरवार आहे याची योग्य जाणीवही त्यांना आहे. या तरवारीला कल्पकतेच्या सुंदर आणि बळकट मुठीची जोडही सुदैवानें मिळालेली आहे. त्यामुळें अनुभूतीच्या कुठल्याहि प्रदेशांत त्यांची प्रतिभा रणरागिणीच होईल. उमरखय्यामपासून मार्क्सपर्यंत जगांत होऊन गेलेल्या अनेक कलावंतांचे व द्रष्ट्यांचे संस्कार त्यांच्या प्रतिभेवर झाले असले तरी ते त्यांनीं पचविले आहेत–आत्मसात् केले आहेत. त्यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह मराठी कवितेचें एक भूषण मानला जावा इतका सरस आहे.

वाङ्मयीन मूल्यांचा काथ्याकूट करणारे या संग्रहांत हवे तेवढे दोष काढोत, शेक्सपिअरचे तीनशें टीकाकार वाचून हल्लीचें मराठी वाङ्मय निःसत्त्व आहे असा आक्रोश करणारे प्राध्यापक या संग्रहाविषयीं कांहींहि म्हणोत, रसिक महाराष्ट्रीय जनता काव्यप्रांतांतल्या पुढल्या प्रवासांतहि खालील ओळी गात रहा अशीच कुसुमाग्रजांना विनंति करील.

‘ कोट्यवधी जगतांत जिवाणू जगती अन् मरती
जशीं तीं गवताचीं पातीं
नाविक आम्ही परंतु फिरतों सात नभांखालीं
निर्मितों नव क्षितिजें पुढतीं.

चला उभारा शुभ्र शिडें तीं गर्वानें वरतीं
कथा या खुळ्या सागराला
‘ अनंत अमुची ध्येयासक्ति अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला ! ’ ’

खासबाग, कोल्हापूर.
ता. १–३–४२

वि. स. खांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
वि: ...
नों: दि. ...

REFBK-0010587